POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२८१ ● मुंबई, मंगळवार, १३ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

आज लागणार दहावीचा निकाल!!!

जाणून घ्या किती वाजता आणि कुठे पाहता येणार रिझल्ट

■मुंबई । प्रतिनिधी :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या निकालाची तारीख बोर्डाने जाहीर केली आहे. महाराष्ट्र शिक्षण मंडळाकडून पुढील दोन आठवड्यामध्ये निकाल जाहीर होणार असं सांगितलं जात होतं. मात्र त्यापूर्वीच आज विद्यार्थ्यांना आश्चर्याचा धक्का देताना १३ मे २०५ रोजी निकाल जाहीर होणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. यासंदर्भातील पत्रकच बोर्डाने जारी केलं आहे.

कुठे पाहाल निकाल?

महाराष्ट्र बोर्डाचा १० वी चा निकाल पाहण्यासाठी खालील वेबसाइट्स वापरू शकता:

- mahresult.nic.in
- sscresult.mkcl.org
- sscresult.mahahsscboard.in.

कधी आणि किती वाजता लागणार निकाल?

बोर्डाचे सचिव देविदास कुलाळ यांच्या स्वाक्षरीने जारी केलेल्या पत्रकामध्ये, ''फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेच्या निकालाबाबत'' अशा मथळ्याखाली सविस्तर माहिती देण्यात आली आहे. ''महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेचा निकाल मंगळवार, दिनांक १३ मे, २०२५ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे,'' अशी घोषणा पत्रातून बोर्डाने केली आहे. तसेच श्यासंदर्भात पत्रकार परिषद मंगळवार, दिनांक १३ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राज्य मंडळ कार्यालयात आयोजित केलेली आहे,'' असंही सांगण्यात आलं आहे.

असा पाहा निकाल

- दहावी बोर्डाचा निकाल पाहण्यासाठी सर्वप्रथम अधिकृत वेबसाइट mahresult.nic.in वर जा.
- दहावी निकालाच्या लिंकवर क्लिक करा.
- तुमचा रोल नंबर आणि जन्मतारीख आणि आवश्यक माहिती भरा.
- दहावीचा रिझल्ट तुमच्या स्क्रीनवर दिसेल.

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निकालापूर्वीच आनंदाची बातमी! महाराष्ट्र बोर्डाचा मोठा निर्णय

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या निकालानंतर आता विद्यार्थी आणि पालक प्रतीक्षेत आहेत ते दहावीच्या निकालाची. खरंतर महाराष्ट्र बोडार्ने दहावीच्या निकालाची तारीख अद्याप जाहीर केली नाहीय. महाराष्ट्र बोर्डाकडून सांगण्यात आलं आहे की, पुढील दोन आठवड्यांत निकाल जाहीर होणार. पण दहावीच्या निकालापूर्वी महाराष्ट्र बोडार्ने दिलासादायक बातमी दिली आहे.

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निकालापूर्वीच आनंदाची बातमी

दहावीची निकाल लागल्यानंतर विद्यार्थी आणि पालक यांची अकरावीच्या प्रवेशासाठी या कॉलेज ते कॉलेजच्या पायऱ्या चढावा लागतात. विद्यार्थी आणि पालक यांची ही गैरसोय आणि धावपळ टाळण्यासाठी महाराष्ट्र बोर्डाने महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्र बोडार्ने यंदा अकरावीची संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबची माहिती बोडार्ने एक प्रसिद्धीपत्रक जारी करुन दिली आहे. महाराष्ट्र बोडार्ने स्पष्टपणे सांगितलं आहे की, अकरावीच्या प्रवेशासाठी सर्व प्रक्रिया ऑनलाइनच होणार असून यासंदर्भात बोडार्ने विद्यार्थी आणि पालकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केलं आहे. अनधिकृत वेबसाइट्सवरून प्रसारित होणाऱ्या जाहिरातींवर विश्वास ठेऊ नये, असं आवाहन महाराष्ट्र बोडार्ने केलं आहे. तर प्रवेश प्रक्रियेसाठी फक्त शासनाच्या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा, असं आवर्जून सांगितलं आहे. अन्यथा तुमची फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांनी याची काळजी घ्यावी.

या संकेतस्थळावरून करा नोंदणी!

तसंच अकरावी प्रवेशासाठी शासनाचे अधिकृत संकेतस्थळ **Mahafyjcadmissions.in** याचा वापर पालक आणि विद्यार्थ्यांनी करावा असं आवाहन महाराष्ट्र बोडार्ने केला आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी केवळ या संकेतस्थळाचा वापर करावा, असे आवाहन बोडार्ने केले आहे.

लाडक्या बहिणींना १५०० रुपयांवर ठेवायचं नाहीय, लखपती बनवायचंय : मुख्यमंत्री

■मुंबई । प्रतिनिधी :

महाराष्ट्रातील 'लाडक्या बहिणी' १५०० रुपयाचा हफ्ता २१०० रुपये कधी होणार? याची वाट पाहतायत. असे असताना आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लाडक्या बहिणींना आनंदाची बातमी दिलीय. लोकसभा निवडणुकीत फटका पडल्यानंतर महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात लाडकी बहीण योजना आणली.

लाडक्या बहिणी खूष- झिरवळ

लाडक्या बहिणी नाराज असल्याचे आपण किंवा विरोधक सांगतात. पण सर्व लाडक्या बहिणीला खुश आहेत. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असं कोणीही म्हटलेलं नाही, असं विधान मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केलंय. हे पंधराशे रुपयेदेखील देण्याची यांची देण्याची ऐपत नाही असा प्रचार विरोधकांनी सुरू केला होता. मात्र १५०० रुपये दिल्यानंतर विरोधकांनी आता २१०० रुपयावर जास्त जोर धरला आहे. मला वाटतं पंधराशे रुपये ही रक्कमदेखील परिपूर्ण आहे. महिला पंधराशे रुपये मिळाल्यानंतरही खुश आहेत, असे झिरवळ म्हणाले.

याअंतर्हत पात्र महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा करण्यात येतात. विधानसभा निवडणुकीत सरकार पुन्हा सत्तेत आल्यास ही रक्कम २१०० रुपये करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. पण ते पूर्ण न झाल्याने लाडक्या बहिणींमध्ये नाराजी आहे. असे असताना आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यावर महत्वाचे विधान केलंय.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी वर्ध्यात बोलत असताना लाडकी बहीण योजनेसंदर्भात महत्वाचे भाष्य केले. सुरुवातीला त्यांनी २५ टक्के अपघाताच प्रमाण कमी झाल्याने वधार्वासियांचे आभार मानले. परिवहन मंत्र्याची वर्धा जन्मभूमी आहे. तुम्ही त्यांना ५० बसेस मांगीतल्या. तुम्ही १०० बस मांगीतल्या असत्या तरी त्यांनी दिल्या असत्या. कारण जन्मभूमीपेक्षा काहीच महत्वाचं नसत. तुमच्या आमदारांनी कंजूसी केलीय, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

आम्हाला आमच्या लाडक्या बहिणींना १५०० रुपये देऊन ठेवायचं नाहीय. तर त्यांना लखपती दीदी बनवायच आहे, असे यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रातील १ कोटी बहिणींना लखपती दीदी बनवायचं आहे, असे यावेळी मुख्यमंत्री म्हणाले.

'लाडकी बहीण'च्या नावाने कोट्यवधींचा घोटाळा

गुजरातमधून २५०० मुंबईकर... पोलिसांच्या हाती घबाड

■रायगड । प्रतिनिधी :

विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये गेम चेंजर ठरेलल्या 'लाडकी बहीण' योजनेच्या नावाखाली मुंबईमध्ये अडीच हजार जणांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणामध्ये जुहू पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पैसे मिळवून देण्याच्या नावाखाली खाती उघडून ती खाती सायबर गुन्हेगारांना विकणाऱ्या टोळीचा पदार्फाश झाला आहे. या घोटाळेबाजांनी मुंबईमधील वेगवेगळ्या भागातील अडीच हजार जणांना गंडा घातला आहे. विशेष म्हणजे गुजरातमधून २५०० मुंबईकरांना हा गंडा घालण्यात आला आहे.

पुरुषांच्या नावानेही खाती

जुहू पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये काही बँकांनी व्हेरिफिकेशन आणि इतर पात्रता तपासून पाहिली नाही. खास करुन चाळीत राहणाऱ्या खात्यांचं व्हेरिफिकेशन झालं नाही. पोलिसांनी आतापर्यंत १०० हून अधिक खाती बंद केली आहेत. विशेष म्हणजे नावाप्रमाणे 'लाडकी बहीण' योजना ही महिलांसाठी असतानाही अनेक पुरुषांच्या नावानेही खाती सुरु करण्यात आली होती. तुम्हालाही या योजनेअंतर्गत महिन्याला दीड हजार रुपये मिळतील असं फसवणूक करणाऱ्या टोळीनं सांगितलं होतं.

खातं सुरु केल्यावर हजार रुपये द्यायचे अन्...

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा गुजरातमधील सूरतमधील असून त्याने मुंबईतील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्यांना लक्ष्य केलं. मुंबईतील नेहरु नगर, डी. एन. नगर, धारावीमधील नागरिकांना या टोळीने गंडा घातल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दर महिन्याला तुम्हाला 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत दीड हजार रुपये मिळतील असं सांगून या टोळीने अनेकांच्या नावाने बँक खाती सुरु केल्याचं वृत्त 'मिड डे'ने दिलं आहे. त्यांनी बँक खाती सुरु करणाऱ्यांना सुरुवातीला एक हजार रुपये दिले. तसेच उरलेले ५०० रुपये पुढील काही महिन्यांमध्ये तुम्हाला मिळतील असं सांगितलं. मात्र आरोपींनी नंतर ही खाती सायबर गुन्हेगारांना आणि मनी लॉन्ड्रींग करणाऱ्या आरोपींना विकली.

कसं समोर आला हे प्रकरण?

नेहरुनगरमध्ये राहणारा २२ वर्षीय मजूरी करणारा वलिक सय्यद खान याने या प्रकरणामध्ये विले-पार्ले पश्चिम येथे तक्रार दाखल केल्यानंतर हा प्रकार समोर आला. वलिकच्या पत्नीला १३ फेब्रुवारी रोजी परिसरातील काही जणांनी 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत महिन्याला दीड हजार रुपये मिळतात असं सांगितलं. सीमकार्ड वापरुन बँक खातं सुरु करा आणि तुमच्या आधार कार्ड तसेच पॅन कार्डची फोटो कॉपी द्या असं वलिक आणि त्याच्या पत्नीला सांगण्यात आलं. वलिकने पत्नीबरोबर बँकेत जाऊ तिचं खातं उघडून घेतलं. त्यानंतर या टोळीच्या माध्यमातून खातं उघडलं त्या टोळीतील आरोपीने वलिकला एक हजार रुपये दिले.

१५ फेब्रुवारी रोजी वलिकने पुन्हा एकदा या व्यक्तीला फोन करुन इतर काही जणांची खाती उघडायची असल्याचं सांगितल्यानंतर या टोळीतील सदस्य नेहरु नगरमध्ये आला. मात्र त्यावेळी स्थानिकांना या व्यक्तीवर संशय आल्याने स्थानिकांनी जुहू पोलिसांना याबद्दल माहिती दिली. पोलीस निरीक्षक प्रवीण पाटील आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजित चव्हाण यांनी तातडीने या ठिकाणी दाखल होतं संशियताला ताब्यात घेतलं. त्यावेळी आरोपीची ओळख पटली. अविनाश कांबळे नावाचा हा २५ वर्षीय तरुण वसईचा रहिवाशी असून त्याने फाल्गून जोशी, रितेश जोशी, प्रतिक, श्रृती रवी राऊत यांच्या आदेशानुसार खाती उघडून दिल्याचं पोलिसांना सांगितलं. त्याने प्रत्येक खात्यामागे आपल्याला 4 हजार रुपये दिले जायचे अशीही कबुली दिली.

तपासामध्ये धक्कादायक खुलासा

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील जाधव यांनी जुहू पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांची एक टीम तयार केली. या टीमच्या तपासामध्ये कांबळे हा झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या अशिक्षित लोकांना लक्ष्य करायचा असं दिसून आलं. खातं उघडल्यानंतर ही टोळी खात्याशी संलग्न सीमकार्ड, कागदपत्रं ज्यात पासपोर्ट, आधार कार्ड आणि पॅन कार्डसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांची प्रत घ्यायचे. त्यानंतर कांबळी ही खाती रितेश जोशी, श्रृती राऊत आणि फाल्गुनी जोशी यांना विकायचा.

कोट्यवधींचे व्यवहार

वरिष्ठ पोलीस निरीक्षक लांडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''आम्ही बँकांशी संपर्क साधून खाती गोठवली आहेत. आम्ही श्रृती राऊतच्या घरावर छापा मारला असून तिच्याकडे अनेक पासबुक, डेबिट कार्ड आणि सीम कार्ड सापडले. फाल्गुनी जोशीलाही अठक करण्यात आली असून तिच्या घरी अनेक पासबुक सापडली. आम्ही गोठवलेल्या १०० हून अधिक खात्यांमध्ये १९ लाख ४३ हजार ७७९ रुपये आहेत. या खात्यांवरुन कोट्यवधींचे व्यवहार झालेत. ही खाती सायबर गुन्हे आणि मनी लॉन्ड्रींबरोबरच काळ्या पैशांच्या व्यवहारासाठी वापरली जायची.''

'या' मुहूर्तावर मान्सून महाराष्ट्रात

तत्पूर्वी होणार वादळी पाऊस अन् अवकाळीचा मारा...

■मुंबई । प्रतिनिधी :

अंदमान आणि निकोबार बेटांवर मान्सूनच्या आगमानास सुरुवात झाली असून, या वा[]यांचा एकंदर वेग पाहता यंदाच्या वर्षी केरळात हे वारे मे महिन्यातच दाखल होणार असल्याचा प्राथमिक अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मान्सूनचं आगमन ठरल्याप्रमाणं होत असतानाच इथं महाराष्ट्राच मात्र हवामान बदलानी नागरिकांच्या आणि प्रामुख्यानं बळीराजाच्या चिंतेत भर टाकली आहे.

पुढील २४ तासांसाठी राज्याच्या पश्चिम, मध्य आणि विदर्भ क्षेत्रातील काही भागांना वादळी पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. या भागात गारपिटीचाही तडाखा बसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रात प्रामुख्यानं सातारा आणि कोल्हापूर इथं जोरदार पावसाची शक्यता आहे. तर, पुण्यात आकाश अंशतः ढगाळ असेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

अरबी समुद्राच्या मध्यापासून ते थेट गुजरातपर्यंत आणि मराठवाडा ते तामिळनाडूपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्याच कारणानं मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्गातही आकाश झाकोळलेलं दिसून येत आहे. तर, छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भाच्या बहुतांश भागांवरही या वादळी पावसाची वक्रदृष्टी असेल असा स्पष्ट इशारा हवामान विभागानं देत नागरिकांना सतर्क केलं आहे.

सध्या मोसमी वारे निकोबार बेटांवर दाखल झाले आहेत. ज्यामुळं २७ मेपर्यंत मान्सून केरळ किनारपट्टीवर पोहोचणार असल्याचं चित्र दिसत आहे. मुख्य म्हणजे मागील १७ वर्षांत प्रथमच मान्सून ४ दिवस आधी केरळात येणार असून, ६ जूनपासून मान्सूनचा महाराष्ट्रातील प्रवास सुरू होण्यास पोषक वातावरण पाहायला मिळत आहे. ज्यामुळं यंदा तीन दिवस आधीच मान्सून राज्यात दाखल होईल. तत्पूर्वी मात्र वादळी पाऊस आणि गारपीटसदृश्य वातावरणामुळं मान्सूनची पार्श्वभूमी तयार होईल असं म्हणणं गैर नाही.

मान्सूनची वाटचाल...

देश स्तरावर केंद्रीय हवामानशास्त्र विभागानं जम्मू काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश या भागांसह उत्तराखंड आणि राजस्थानमध्ये पावसाचा अंदाज वर्तवला आहे. यादरम्यान ताशी ५० ते ६० किमी इतक्या वेगानं वारे वाहतील असाही इशारा देण्यात आला आहे. देशाच्या दक्षिणेकडे ११ ते १५ मे दरम्यान मान्सूनपूर्व पाऊस जोर धरणार असून, त्यामुळं तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश अशी राज्य प्रभावित होतील.

टिक टिक टिक... पार्क केलेल्या कारमधून सतत येत होता आवाज, बॉम्बच्या भीतीने पळापळ, पण सत्य काही वेगळंच!

■जळगाव । प्रतिनिधी :

भारत-पाकिस्तान तणावादरम्यान पाकड्यांकडून अनेक कुरापती केल्या जात असून त्याच पार्श्वभूमीवर सध्या देशभरात हाय अलर्ट असून सुरक्षा व्यवस्थेतही कडक वाढ करण्यात आली आहे. पोलीस तर चोख लक्ष देत आहेतच. पण नागरिकांनाही सावध राहण्याचे आवाहन करण्यात आलं आहे. याचदरम्यान जळगावमध्ये एका कारमध्ये बॉम्ब आहे की काय अशा शंकेमुळे नागरिकांची एकच त्रेधातिरपीट उडाली होती, मात्र पोलीस आणि बॉम्बशोधक पथक आल्यावर त्यांनी शोध घेतला असता सत्य काहीतरी वेगळंच निघालं. आणि सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. नेमकं घडलं तरी काय, जाणून घेऊया. जळगावच्या रेल्वे स्थानक परिसरात उभे असलेल्या एका गाडीमध्ये बॉम्ब असल्याच्या माहितीने मोठी खळबळ उडाली होती. रेल्वे स्टेशन परिसराक उभ्या असलेल्या एका कारमधून टिक टिक टिक.. असा घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे सतत आवाज येत होता. ते लक्षात येताच नागरिकांची घाबरगुंडी उडाली. कारमधून घड्याळाच्या काट्याप्रमाणे बाहेर पडत असलेल्या आवाजामुळेच परिसरातील नागरिकांमध्ये भीती पसरली. अखेर उपस्थितांपैकी कोणीतरी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर जळगाव जिल्हा पोलिस दलाचे बॉम्ब शोध नाशक पथक व कर्मचारी ताडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांच्याकडून तपासणी करण्यात आली. सतत आवाज येणारे हे वाहन जळगाव रेल्वे स्थानकावर गेल्या दोन ते तीन दिवसांपासून उभे असल्याची माहिती समोर आली. त्याची बॅटरी संपल्यामुळे असा आवाज येत असल्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र त्यानंतर घटनास्थळी आलेल्या पोलिसांनी खबरदारी तसेच काळजी म्हणून सदरचा परिसर रिकामा केला, क्षणात तो निर्मनुष्य करण्यात आला होता.

अपघात की आत्महत्या?

नागपूरच्या खदानीत ५ जणांचा बुडून मृत्यू

■नागपुर । प्रतिनिधी :

नागपुर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील सुरगाव शिवार येथे ५ जणांचा बुजून मृत्यू झाला आहे. जुन्या खाणीतील पाण्याने भरलेल्या खड्डयात बुडून ही घटना घडली आहे. यामध्ये एक पुरुष दोन महिला आणि दोन लहान मुलांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरमधील एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू झाला आहे. नागपूर जिल्ह्यातील या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे.

एहतेशाम अन्सारी २६ वर्ष, रोशनी चौधरी ३२ वर्ष, अंजली चौधरी २५ वर्ष, मोहित चौधरी १० वर्ष, लक्ष्मी चौधरी ८ वर्ष अशी मृतांची ओळख पटली आहे. ही दुर्घटना आहे की सामूहिक आत्महत्या हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलीस पुढील तपास करत आहेत. पाण्याने भरलेल्या खड्डयात बुडून ५ जणांचा एकाच वेळी मृत्यू झाल्यानं ही दुर्घटना आहे की आत्महत्या असे प्रश्न उपस्थित केले जात आहे.

नेमका काय प्रकार घडला? हे ५ जण या ठिकाणी कसे आले? ही दुर्घटना आहे की हत्या? या सगळ्याचा पोलीस कसून तपास करत आहेत. या खड्याच्या शेजारी ५ जणांनी आपल्या चपला आणि पुरुषाच्या खिशातील सामानही दिसत आहे. त्यामुळे हा सगळा प्रकार नेमका काय आहे, हे कळायला मार्ग नाही.

दोन मुलांचा मृत्यू

काही दिवसांपूर्वी पूर्णा नदीपात्रामध्ये दोन मुलांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. उमेश कासारे १० वर्षीय आणि ८ वर्षीय ज्ञानेश्वर घोरपडे यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

निमखेडा बुद्रुक येथे ५ मुले पूर्णा नदीपात्रात पोहोयला आले होते. येथे पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने २ मुलांचा बुडून मृत्यू झाला. बाहेर काढल्यावर मुलांना जाफराबाद खासगी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

इंस्टाग्रामवरील मेसेज ठरला जीवघेणा!

५ भावा-बहिणींनी मिळून पुण्यातील तरुणाचा जीव घेतला

■पुणे । प्रतिनिधी :

इंस्टाग्रामवर मेसेज पाठवत बहिणीला शिवीगाळ केल्याचा राग मनात धरून बहिण भावासह पाच जणांनी एका तरुणाला पुण्यातून उचलून कोपरगाव येथील कोकमठाण शिवारात आणत जबर मारहाण केली. इतकंच नव्हे तर त्याची विष पाजून त्याची हत्या केल्याची घटना कोपरगाव तालुक्यात घडल्याने एकच खळबळ उडाली आहे.

साईनाथ गोरक्षनाथ काकडे (वय २४, रा. डोऱ्हाळे ता. राहाता) असे मयत युवकाचे नाव असून सदर तरुणाच्या घरी घटनेची माहिती मिळाल्यानंतर तरुणाला जखमी अवस्थेत शिर्डीच्या सुपर हॉस्पिटल येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत्य घोषित केले. तरुणाच्या मृत्यूमुळं जमाव आक्रमक झाल्याने काहीकाळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

तालुक्यातील कोकमठाण येथे तरुणाला मुलीच्या घरच्यांकडून बेदम मारहाण करण्यात आली. मारहाणीनंतर त्याला काहीतरी विषारी औषध पाजले गेलंय. या घटनेबाबत कोपरगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २५१/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) १४० (१), १८९ (२) १९१ (२) प्रमाणे पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत साईनाथ आणि आरोपी यांची पूवीर्पासूनच ओळख असल्याने नेमकं काय घडलं.? ज्यामुळे थेट हत्या करण्यात आली. या बाबत अधिक तपास वरिष्ठ पोलीस अधिकारी करत आहेत.

नेमकं काय घडलं होतं?

साईनाथ याने रुपाली लोंढे हिच्या बहिणीला इस्टाग्रामवरुन मेसेज करुन शिवीगाळ केली होती. त्याचाच राग मनात धरून आरोपी १) रुपाली संजय लोंढे २) अनिल संजय लोंढे ३) दिनेश विठ्ठल आसने ४) राहुल अशोक चांदर आणि एक अल्पवयीन बालक हे साईनाथ राहत असलेले ठिकाणी पुणे येथे गेले व त्याला घरातून ओढत आणले. त्यानंतर गाडीमध्ये टाकून कोकमठाण येथे घेवून गेले. याबाबत पुण्यातील सीसीटीव्ही फुटेजदेखील समोर आले आहे.

संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

पण संधी गमावली!

पाकिस्तानमधून आलेल्या दहशतवाद्यांनी पहलगाम येथे निष्पाप २७ पर्यटकांची हत्या केल्यानंतर त्या दहशतवाद्यांची जननी असलेल्या पाकिस्तानवर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून हवाई हल्ला केला. त्यात पकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे ९ तळ नेस्तनाबूत झाले. त्यात संसदेवरील हल्ल्यामागील सूत्रधार अजहर मसूद यांच्या कुटुंबातील १४ जण ठार झाले. ७ मे रोजी मध्य रात्री भारताने केलेल्या हल्ल्यात लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी मुदस्सर खादियान खास, जैश-ए-मोहम्मदचा हाफिज मुहम्मद जमील, जैश-ए-मोहम्मदचा मोहम्मद युसूफ अजहर, लष्कर-ए-तोयबाचा खालिद, जैश-ए-मोहम्मद संघटनेचा मोहमद हसन खान हे ठार झाले. भारताने ड्रोनच्या माध्यमातून पाकिस्तानी लष्कराच्या एअर डिफेन्स सिस्टिम नेस्तनाबूत केल्या अशीही माहिती आहे. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून बाजूला केले आणि महिला मुलांच्या समोर त्यांची हत्या केली. हिंदू महिलांच्या पतींची त्यांच्या डोळ्यादेखत हत्या करण्यात आली. त्यांच्या कपाळावरील कुंकू पुसण्यात आले. या अमानवीय आणि असंवेदनशील हल्ल्याला जशासे तसे उत्तर द्यावे, असे भारतीयांची इच्छा होती. तशी संतापाची लाट उसळली होती. त्यामुळे केंद्र सरकारने त्या दृष्टीने हालचाली सुरू केला. त्यातून 'ऑपरेशन सिंदूर' सुरू करण्यात आले. केंद्र सरकारने सुरूवातीला पाकिस्तानवर पाच निर्बंध लादून त्यांच्या नाड्या आवळायला सुरुवात केली. त्याचा एक भाग म्हणून सिंधू पाणी वाटप करार रद्द करण्यात आला. पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्यास सांगून त्यांना बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळावर हल्ले सुरू केला. १९७१ नंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये फार मोठी युद्ध कारवाई झालेली नव्हती. कारगीलमधील 'ऑपरेशन विजय' हे पाकिस्तानी घुसखोरांना हुसकावून लावण्या इतपत मर्यादित होते, पण आता 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने केलेली कारवाई ही पाकिस्तानच्या सीमेत घुसून केलेली कारवाई होती. त्यात भारतीय सैन्य प्रत्यक्ष सीमा पार करून पाकिस्तानी हद्दीत शिरले नाही, त्यांनी लढाऊ विमाने आणि ड्रोनच्या माध्यमातून ही कारवाई केली. या कारवाईला चांगले यश मिळाले. याच वेळी पाकिस्तानने पूंछसारख्या सीमा भागात तोफगोळे डागून भारतीय हद्दीत मनुष्यहानी केली आणि लोकांच्या घरांचे नुकसान केले. भारताच्या विरोधात लढण्यासाठी पाकिस्तानने विविध देशांकडे मदत मागितली, पण तुर्कस्थान सोडून त्यांच्या मदतीला अगदी त्यांचा मित्र असलेला चीनही उभा राहिला नाही, असे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी त्यांच्या संसदेतील भाषणात सांगितले. आता आपल्याला पाकिस्तानला वाचवण्याची गरज आहे, नाही तर भारताचे हल्ले सुरूच राहिले तर पाकिस्तान भारताच्या ताब्यात जाईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर पाकिस्तानकडून युद्धविरामाच्या हालचाली सुरू झाल्या. पुढे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये युद्धबंदी झाल्याचे एक्स माध्यमातून जाहीर केले. भारत आणि पाकिस्तानने ते मान्य केले. पहलगाम येथे २६ पर्यटकांना ठार करणारे अतिरेकी भारतात आले कुठून, लष्कराच्या गुप्तहेर खात्याला ते हल्ला करण्यापूर्वी आणि हल्ला केल्यानंतरही का सापडले नाहीत, असा प्रश्न विरोधकांकडून विचारण्यात येत आहे. त्याचे उत्तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे नसावे, म्हणून ते पाकिस्तानविरोधात कारवाई करण्याविषयी भूमिका ठरवण्यासाठी घेतलेल्या सर्व पक्षीय बैठकीला उपस्थित राहिले नसावेत. आता पाकिस्तान सर्व बाजूंनी कचाट्यात सापडलेला असताना अनपेक्षितपणे युद्धविराम का करण्यात आला. युद्ध कारवाई पुढे चालवून पाकिस्तानचा कायमचा बंदोबस्त करण्याची संधी भारताला मिळालेली होती. कारण सध्या भारताची सरशी होती, पण भारताने कारवाई थंड केली. त्यामुळे भारतातील अनेकांचा अपेक्षाभंग झालेला आहे. विरोधी पक्षातील नेतेही हाच प्रश्न सरकारला विचारत आहेत. त्यासाठी अधिवेशन बोलवण्याची मागणी करत आहेत. तर दुर्सया बाजूला 'ऑपरेशन सिंदूर' हे संपलेले नाही, पुन्हा अतिरेकी हल्ला झाला तर ते युद्ध समजून त्याला उत्तर दिले जाईल, असे केंद्र सरकारने म्हटले आहे. पाकिस्तान भारताकडून यापूर्वी चार वेळा पराभूत झाला आहे, तरीही तो सुधारलेला नाही. दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्यांनी भारताचे लाखो लोक ठार केले आहेत. त्यामुळे यावेळी पाकिस्तान चांगलाच कचाट्यात सापडला होता, त्यामुळे त्या संधीचा व्यापक उपयोग करून घ्यायला हवा होता, हीच भावना आज जनसामान्यांमध्ये आहे. पाकिस्तानच्या निर्मितीपासून भारताने पाकिस्तानला सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले, पण त्याचा काही उपयोग झालेला नाही. पाकिस्तान आपले रंग दाखवत राहिला. पंडित नेहरू आणि इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानशी झालेल्या युद्धांच्या वेळी काय चुका केल्या ते भाजपचे नेते नेहमी आवेशाने सांगत राहिले, पण ते स्वतः जेव्हा केंद्रस्थानी आले तेव्हा पाकिस्तानचा बंदोबस्त करताना आंतरराष्ट्रीय परिस्थिती आपला रस्ता किती अवघड करून टाकते, हे त्यांच्या आता लक्षात आले असावे. तीन महिन्यांपूर्वी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आम्ही पाकव्याप्त काश्मीर सहज घेऊ, इतकी आपली तयारी आहे, असे म्हटले होते, पण आता जेव्हा संधी आली तेव्हा का जमले नाही, हा प्रश्न घेऊन विरोधी पक्षातील नेते त्यांच्या मागे लागले आहेत.

जागतिक उद्योगांना भारतीय पंख

'यत्र प्रतिभा अवसर प्रप्नोतिहि...' हे इंडियन प्रीमिअर लीगच्या (आयपीएल) करंडकावर कोरलेले संस्कृत वचन आहे. 'जिथे गुणवत्तेला संधी मिळते' असा त्याचा अर्थ. एक देश म्हणूनच आपण आता अशा वळणावर आहोत, की गुणवत्ता आणि संधी यांचा संगम घडणे जणूकाही अनिवार्य व्हावे. भारताची अर्थव्यवस्था गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकात खुली करण्यात आली, तेव्हापासून या गुणवत्तेला अधिक खुले अवकाश मिळू लागल्याची प्रचिती आपण वारंवार घेत आहोत. किंबहुना, हीच गुणवत्ता हेरून जगभरातील उद्योगसंस्था भारताकडे पावले वळवत आहेत, तेही केवळ काम करणारे हात-पाय शोधत नव्हे, तर त्या हाता-पायांना काम देऊ शकणारी डोकी शोधत! त्यातून जसा त्यांचा फायदा होत आहे, तसाच लाभ देश म्हणून आपलाही होत आहे.

जगभर मागणी असणारी ज्ञान-कौशल्ये भारतीय तरुण आत्मसात करू लागल्यामुळे देश म्हणून आपण प्रगतिपथावर पावले टाकू लागलो आहोत. त्याची पावती म्हणून आपल्याला सध्या मागणी असणाऱ्या जागतिक क्षमताविकास केंद्रांकडे (ग्लोबल कपॅबिलिटी सेंटर्स - जीसीसी) पाहता येईल. एके काळी किफायतशीरतेच्या कसोटीवर उतरल्यामुळे ह्यबीपीओह्नचे आगर ठरू लागलेला आपला देश आता गुणवान आणि कौशल्यपूर्ण मनुष्यबळाच्या जोरावर याच बहुराष्ट्रीय कंपन्यांना विकासाची दिशा दाखवू पाहणाऱ्या केंद्रांसाठीची पोषक भूमी ठरत आहे. महत्त्वाचे म्हणजे जगभर जागतिकीकरणाच्या उलटी पावले टाकली जात असली तरी या केंद्रांचे अस्तित्व, त्यासाठी भारताला दिली जाणारी पसंती आणि त्यातून भारताच्या 'क्षमताविकासा'ला मिळू लागलेली चालना यांमध्ये मात्र घट होण्याची चिन्हे नाहीत, ही दिलासादायक बाब आहे.

या जागतिक क्षमताविकास केंद्रांचा इतिहास उण्यापुऱ्या २५-३० वर्षांचा आहे. जगभर पसारा असणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी खर्चकपातीच्या हेतूने या केंद्रांकडे पाहण्यास सुरुवात केली होती. कालांतराने संगणकप्रणाली विकास, संशोधन व उत्पादन विकास, डेटा ॲनालिटिक्स, नवकल्पनाविष्कार यांसाठीही या केंद्रांकडे जबाबदाऱ्या सोपवण्यास सुरुवात झाली आणि आता ही केंद्रेच या कंपन्यांच्या उत्पादने व सेवांमधील नवता आणि व्यवसाय परिवर्तन यांसाठीची मुहूर्तमेढ रोवू लागली आहेत.

भारतातील केंद्रांचे स्वरूप

क्षमताविकास केंद्रांचे हे लोण एकविसाव्या शतकातील असले, तरी भारताकडे या दृष्टिकोनातून पाहण्याला गेल्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यामध्येच सुरुवात झाली होती. १९८५मध्ये 'टेक्सास इन्स्ट्रुमेंट्स' या अमेरिकी कंपनीने भारताकडे उपलब्ध होऊ लागलेली अभियांत्रिकी क्षेत्रातील गुणवत्ता हेरून भारतामध्ये संगणकप्रणाली अभिकल्प (सॉफ्टवेअर डिझाइन) केंद्र स्थापन केले. पुढे नव्वदच्या दशकात मायक्रोसॉफ्ट कंपनीने हैदराबादेत भारत विकास केंद्र सुरू केले, तर जनरल इलेक्ट्रिक आणि आयबीएम यांनीही दिल्ली, बेंगळुरू आणि पुणे या शहरांत

उत्पादन विकास केंद्रे स्थापन केली.

कंपनीची कार्यालयीन कार्यक्षमता वाढवणे, त्यासाठीचे मार्ग सुचवणे, कंपनी अधिकाधिक तंत्रसज्ज करणे, कंपनीच्या कार्यप्रणालीत नवकल्पनांचा समावेश करणे आणि हे सर्व कुशल व किफायतशीर मनुष्यबळाचा वापर करून साधणे ही या क्षमताविकास केंद्रांची जबाबदारी असते. २०१०मध्ये आपल्या देशात या केंद्रांची संख्या ७५० होती, तीत एक हजाराहून अधिक केंद्रांची भर पडली आहे. जानेवारी २०२५अखेरीस उपलब्ध आकडेवारीनुसार, भारतात सध्या असणाऱ्या अठराशेहून अधिक जागतिक क्षमताविकास केंद्रांमध्ये वीस लाखांहून अधिक माणसे काम करत आहेत. ही केंद्रे वार्षिक ६४.६ अब्ज डॉलर एवढ्या महसुली उत्पन्नाची भर अर्थकारणात घालत आहेत. त्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या आघाडीवर आहेत. त्याच्या जोडीला, वित्तीय सेवा, उत्पादन आणि आरोग्यसेवा या कंपन्याही क्षमताविकास केंद्रांतून जगभर ठसे उमटवत आहेत.

तंत्रतोडग्यांचा व्यवसायविकासासाठी वापर, डिजिटल परिवर्तन, नवकल्पनाविष्कार, कामकाज व्यवस्थापन व कार्यक्षमता विकास आणि डेटा ॲनालिटिक्स या पाच क्षेत्रांमध्ये ही केंद्रे ढोबळ मानाने कार्यरत असतात. ही केंद्रे स्थापन करण्यासाठी भारताबाहेरील बहुराष्ट्रीय कंपन्याही भारतालाच पसंती देत आहेत. कुशल व गुणवान मनुष्यबळ, किफायतशीर कार्यसंचालन, तंत्रज्ञानातील नवता आणि व्यवसायपूरक सरकारी धोरणे व पायाभूत सोयी ही त्यासाठीची ठळक कारणे आहेत.

सहा महानगरांना प्राधान्य

भारतामध्ये प्रामुख्याने मुंबई, पुणे, बेंगळुरू, हैदराबाद, नवी दिल्ली, चेन्नई या महानगरांत ही केंद्रे स्थापन करण्याकडे कंपन्यांचा कल दिसतो. एकट्या बेंगळुरूमध्ये यातील ८८०हून अधिक जागतिक क्षमताविकास केंद्रे आहेत. स्टार्टअप कंपन्या आणि शैक्षणिक संस्था यांची पोषक परिसंस्था हेदेखील बेंगळुरूकडे या कंपन्यांचा ओढा राहण्यामागील कारण आहे. त्याखालोखाल कंपन्यांची पसंती हैदराबादला आहे. देशातील ३५५हून अधिक क्षमताविकास केंद्रे तेथे आहेत. त्यांमध्ये संगणकप्रणाली विकास आणि डिजिटल सेवांशी संबंधित कंपन्यांचे प्रमाण अधिक आहे. देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे मुंबईला वित्तीयसेवा कंपन्या असे केंद्र उभारण्यासाठी पसंती देत आहेत. तर पुणे परिसरात माहिती तंत्रज्ञानाप्रमाणेच वाहन उद्योग व एकूणच उत्पादन क्षेत्रांतील कंपन्यांची क्षमताविकास केंद्रे विस्तारत आहेत. देशाची राजधानी नवी दिल्लीबरोबरच गुरुग्राम आणि नोएडा या परिसराला ई-व्यापार आणि रिटेल कंपन्या अशा केंद्रांच्या उभारणीसाठी निवडत आहेत. याखेरीज, चेन्नईमध्ये अभियांत्रिकी सेवा आणि उत्पादन क्षेत्राशी संबंधित क्षमताविकास केंद्रांची उभारणी होत आहे.

बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात क्षमताविकास केंद्रे स्थापन करावीत, यासाठी केंद्र सरकारही सकारात्मक भूमिका बजावत आहे. त्या-त्या राज्यांच्या स्तरांवरही प्रोत्साहन स्वरूपात धोरणात्मक पाठबळाची जोड त्याला मिळत आहे. प्रमुख महानगरे व प्रस्थापित केंद्रांपलीकडे अहमदाबाद, कोइमतूर, कोची अशा शहरांनी या केंद्रांसाठी कंपन्यांना आकर्षित करावे यासाठी २०२५च्या केंद्रीय अर्थसंकल्पात आराखडा प्रस्तावित करण्यात आला आहे. याखेरीज, विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये अशी केंद्रे स्थापन करणाऱ्या कंपन्यांना करमाफी, उत्पादने व सेवांवरील शुल्कसवलत आणि अनुपालनाच्या प्रक्रियेचे सुलभीकरण यांचीही घोषणा केली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश या राज्यांनीही अशी केंद्रे स्थापन करण्यासाठी आकर्षक प्रस्ताव ठेवले आहेत.

आपल्या देशाच्या अर्थकारणालाही या केंद्रांमुळे मोठी चालना मिळत आहे. २०१८-१९ ते २०२३-२४ या पाच वर्षांत या केंद्रांमुळे भारतात सहा लाख नवे रोजगार निर्माण झाले आहेत. दहा वर्षांतील ही संख्या १६ लाखांहून अधिक आहे. याच दहा वर्षांत या केंद्रांद्वारे होणारी आर्थिक उलाढाल तिप्पट झाली आहे. नॅसकॉम ही भारतातील तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची शिखर संस्था आणि केपीएमजी ही सल्ला संस्था यांनी केलेल्या अभ्यासातील हे निष्कर्ष आहेत. २०३०पर्यंत या केंद्रांमुळे होणारी उलाढाल ही आताच्या दुप्पट असेल आणि त्यातून भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) ३.५ टक्क्यांची भर पडू लागेल, असे भाकित यंदाच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात केंद्र सरकारने व्यक्त केले आहे.

ज्या आयपीएलच्या करंडकावरील संस्कृत वचनाने या लेखाची सुरुवात केली, त्या स्पर्धेने अनेक भारतीय हिऱ्यांची चमकदार कामगिरी जगापुढे ठेवली व आजही ठेवत आहे. क्रिकेटच्या मैदानाप्रमाणेच तंत्रकौशल्य, अभियांत्रिकी कौशल्य आणि एकूणच व्यावसायिक गरजांसाठी लागणाऱ्या कौशल्यांत निपुण असणारी भारतीय तरुणांची फळी जगाच्या मंचावर स्वतःला आता सिद्ध करू पाहत आहे. जागतिक क्षमताविकास केंद्रांचा मंचही त्यांना खुणावत असेल, यात शंका नाही.

का रे दुरावा...

'पक्षाचे दोन्ही गट भविष्यात एकत्र आले, तर आश्चर्य वाटणार नाही,' असे विधान करून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी राजकारणात पुन्हा खळबळ उडवून देण्याचा प्रयत्न केला आहे. 'प्रयत्न' म्हणण्याचे कारण, की अशी फूट किंवा पुनर्मिलनाचे अनेक प्रयोग पाहिलेल्या महाराष्ट्रातील मतदारांना त्याचे आश्चर्य वगैरे वाटण्याचे दिवस कधीच सरले आहेत. त्यातच पवार यांच्या सहकाऱ्यांची विधाने पाहता, असे काही घडले नाही, तरच नवल म्हणावे लागेल! राजकीय सद्यस्थितीवर 'जो जे वांछिल तो ते लाहो,' असे अनेक अर्थ काढता येण्याजोगे बहुमुखी भाष्य, हा पवार यांचा हातखंडा प्रयोग. त्यातच ज्येष्ठ नेते काहीही बोलले, तरी समर्थकांच्या मते ती 'चाणक्यनीती' उर्फ 'मास्टर स्ट्रोक'च असतो! आत्ताही पवार यांच्या विधानांमधून निरनिराळे अर्थ काढण्यात येत आहेत. 'एकत्र यायचे की नाही, याबाबत मी निर्णय घेणार नाही, ते नव्या पिढीने ठरवावे,' या त्यांच्या विधानात निर्णयप्रक्रियेतून बाजूला जाण्याचे संकेत आहेत, की सत्तेसोबत जाण्यासाठी आतुरलेल्या नेत्यांना कसे आवरावे, याबाबतची हताशा; हे ज्याचे त्याने ठरवावे. 'विरोधी पक्षात राहून राजकारण सोपे नाही,' या त्यांच्याच आमदारांच्या भावनेतून मात्र आजवर केवळ सत्तेचीच ऊब अनुभवलेल्या त्यांच्या पक्षाची 'मन की बात' समोर आली आहे. काँग्रेसमधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना, पुन्हा त्याच काँग्रेसशी हातमिळवणी, सन २०१४मध्ये राज्यात न मागता भाजपला दिलेला पाठिंबा, पुन्हा महाविकास आघाडीची स्थापना आणि पडलेली फूट, असा राष्ट्रवादी काँग्रेसचा वळणावळणाचा राजकीय प्रवास आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांतील नेत्यांमध्ये पूर्वी ठळकपणे जाणवणारा दुरावा आता संस्थांचे कामकाज आणि कौटुंबिक कार्यक्रमांच्या निमित्ताने कमी झाल्याचे दिसते. तेच चित्र राजकीय पातळीवरही दिसणार का, हा खरा प्रश्न.

बुद्धांच्या देशाला शेजाऱ्यामुळे युद्धाची अपरिहार्यता!

युद्ध आणि युद्धाचे परिणाम या कार्यकारणभावाची साखळी तोडण्याची जबाबदारी पाकिस्तानवर आहे. मात्र त्यासाठी तेथील राज्यकर्त्यांना जगाशी सत्य बोलावे लागेल, तसेच स्वतःच्या देशातील लोकांशीही सत्य बोलावे लागेल. स्वतःच्या देशहितासाठी शस्त्रावरील खर्चापेक्षा शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधांवर लक्ष द्यायला हवे. सत्य आणि अहिंसा या एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आज बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी पाकिस्तानला हे समजले तरी त्यांच्यापासून भारताला होणारा उपद्रव टळेल आणि त्यांचेही भले होईल. त्यांच्या कुप्रवृत्तीमुळे बुद्धांच्या देशाला युद्धाची अपरिहार्यता होऊन बसली आहे.

हिंसा आणि युद्ध कर्मविपाकाच्या सिद्धांतानुसार वेदनेचा परिणाम असतो. या परिणामातून पुढील नकारात्मक हिंसेचा परिणाम साध्य होतो. पहिल्या महायुद्धात दुसऱ्या महायुद्धाची बीजे असतात, एका हिंसेतून दुसऱ्या हिंसेची बिजे रोवली जातात. बलशाली विजय मिळवतो तर कमकुवताचा पराभव होतो. मात्र काळामध्ये सातत्य असले तरी काळाचे परिणाम वेगवेगळे असू शकतात. आजचा बलशाली उद्याचा कमकुवत होऊ शकतो.

आजचा कमकुवत उद्याचा बलशाली होऊ शकतो. त्यामुळे ही साखळी काळाने दिलेल्या संधीनुसार कायमस्वरूपी सुरूच राहते. पाकिस्तानने भारतावर युद्ध लादले. पहलगाम हल्ल्याचा तो परिणाम होता, पाकिस्तानने युद्धाची बीजे कायमच रोवली आहेत. या तत्त्वानुसार भारताने बुद्धतत्त्वाचे कायमच पालन केलेले आहे. पहलगामच्या आधी पुलवामा, २६ / ११ मुंबईवर झालेला हल्ला.

मुंबई जवेरी बाजार बॉम्बस्फोट, लोकल ट्रेनमध्ये झालेले बॉम्बस्फोट या वेदनेच्या घटनानंतरही भारताने तीव्र प्रतिक्रिया दिलेली नव्हती. मात्र प्रत्येक घटनेचा एक परिणाम असतो, हतबलतेचे बिघडलेले स्वरूप अत्यंत भयावह असते, म्हणून बुद्ध सांगतात ज्यांच्याकडे शक्ती आहे, ताकद आहे, बुद्धी आहे त्यांनी कमकुवतांचे रक्षण करावे, भारताने पाकिस्तानपेक्षा बलशाली असतानाही तथागत बुद्धांचे हे तत्व पाळले आहे.

बुद्धांचा जन्म आणि त्यांचा करुणामय उपदेश ज्या मातीत उगवला आणि फुलला त्या भारताच्या मूळ जाणिवेतच राजकीय महत्वाकांक्षेसाठी केलेली हिंसा नाही. अगदी सम्राट अशोकांपासून ते छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंत याची शेकडो उदाहरणे आपणास इतिहासात आढळतील. भारतीय संविधानाची त्रिसूत्री स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व, प्रज्ञा शील आणि करुणेवर आधारित असल्याने अशी आगळीक भारतीय तत्त्वज्ञानाकडून झालेली नाही.

अगदी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही अहिंसेचे तत्व महात्मा गांधीजींनी यशस्वी केले. तर जहालवादी गटाकडून अपरिहार्य असलेली हिंसाच झालेली आहे. इंग्रजांच्या कुटुंबीयांना महिलांना बालकांना भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील शस्त्रधारी स्वातंत्र्यसैनिकांनी कधीही लक्ष केले नव्हते. मात्र ब्रिटिशांनी जालियनवाला बाग घडवले. चौरी चौरा येथे पोलिसांच्या झालेल्या हत्या आणि हिंसक हल्ल्यानंतर गांधीजींनी त्यांचे आंदोलन मागे घेतले होते.

बुद्धांनी सांगितलेल्या प्रतिज्ञासमुत्पाद सिद्धांतानुसार घडलेली घटना ही आधीच्या घटनेचा परिणाम असतो. हा कार्यकारण सिद्धांत भौतिकशास्त्राचा पाया मानला जातो. या सोबतच बुद्धांचा कर्मविपाकाचा सिद्धांत सांगतो की, जसे कर्म असेल तसेच त्याचे फळ समोर येते, हा निसर्ग नियम आहे. ज्याप्रमाणे बैलांच्या मागे बैलगाडीची चाके येतात. त्याचप्रमाणे कर्माच्या मागे त्याचे परिणामही येतात. बैलगाडी बैलांना बांधील असते त्याचप्रमाणे कर्म हे परिणामाला बांधील असते.

आपल्या शेजारील देशाने आजपर्यंत केलेले अनुचित कर्म, राजकीय अनैतिकता आणि असत्याचा घेतलेला वेळोवेळी आधार, यामुळे त्या देशाचे कर्म हे अत्यंत दूषित झालेले आहे. त्यामुळे

त्याचा परिणाम ही दूषितच असणार, या नियमाला कुठलाही अपवाद नाही. कारल्याचे बीज लावल्यावर आंब्याचे झाड उगवल्याचे उदाहरण निसर्गात नसते. परिणामांचे तत्व हे कर्मातच अंतर्भूत असते. ज्याप्रमाणे आंब्याच्या झाडाला आंबेच येतात त्यासाठी आंब्याची कोयच जमिनीत रुजवावी लागते, भोपळ्याची नाही.

रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून शाक्य-कोलीय युद्धसदृश्य परिस्थितीमध्ये शक्य संघासोबत झालेल्या चर्चेत सिद्धार्थ गौतमाने मांडलेले मुद्दे यात युद्धाची अपरिहार्यता आणि युद्धाची अनावश्यकता हे दोन्ही मुद्दे स्पष्ट होतात. पाण्यासारख्या नैसर्गिक गरजेसाठी रक्त वाहण्याची गरज क्षत्रिय असतानाही सिद्धार्थ गौतमाला अनावश्यक वाटते. त्यासाठी सिद्धार्थ गौतम लवाद नेमण्याचा पर्याय सुचवतात. शाक्य संघाच्या विरोधात गेल्याने संघ त्यांना वनवासाच्या शिक्षेचा पर्याय सुचवतो, या वनवासातच सिद्धार्थ गौतमाला संबोधी प्राप्त झाल्याचे पुढे स्पष्ट होते.

राजा बिंबिसार, सम्राट अशोकाची कलिंगाची युद्ध उपरती, हिंसक अंगुलीमाल यांच्यासोबत झालेल्या संवादात हिंसा आणि युद्ध याचे परिणाम राजकीय हेतूने हिंसेचा मार्ग निवडर्णाया सत्ताकांक्षांना कसा भोगावा लागतो हे स्पष्ट होत जाते. पाकिस्तानची आज असलेली अवस्था त्यांच्या या भारताविषयी अस्थिर आणि सत्ताकांक्षी असूयेचाच परिणाम आहे.

पाकिस्तानच्या मनात भारतीयांबद्दल असलेला द्वेष हा त्यांच्या नाशास कारणीभूत ठरेल. असाच राग किंवा द्वेष भारतीयांनी आपल्या मनात ठेवल्यास होणाऱ्या अनिष्ट परिणामातून त्यांचीही सुटका होणार नाही. समाज माध्यमांवर सध्या दोन्हीकडून मानसिक, कायिक, वाचिक द्वेष पाहायला मिळत आहे.

परिणामांची ही साखळी तोडणे आवश्यक आहे. भारताने उचललेली शस्त्रे ही स्वसंरक्षणासाठीच होती. जातक कथेतील नागराज आणि भिक्खू यांच्यातील संवाद म्हणूनच मोलाचा आहे. एका सर्प नागराजाची नगरीत दहशत पसरली असताना भिक्खुनी त्याला उपदेश केला. त्याला सांगितले, तुज्या विषदंतामुळे माणसांचा मृत्यू होत आहे. त्यावर नागराजाने उत्तर दिले. असा काही विषदंत माझ्या मुखामध्ये आहे, याची मला कल्पना नाही.

त्यावर भिक्खूंनी त्याला सांगितले. आपली धोकादायक बलस्थाने आपणास माहीत असणे अत्यंत आवश्यक आहे. जर तुला तुझा दंश आणि विषदंताविषयी माहिती नसेल तर तू तुज्या मूर्खपणातून आणि अज्ञानातून शांततेसाठी कमालीचा धोकादायक आहेस. आणि जर तुला ही बाब माहीत असेल तर तू लबाड आणि खोटारडा आहेस. भारताशेजारील देश असाच खोटारडेपणा आज करत आहे.

दहशतवादाचा विषदंत अवघ्या जगासाठी धोकादायक असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. त्यावर नागराजाने उत्तर दिले, मी जर दंश करणे सोडले, तर जग मला संपवून टाकील, यावर बौद्ध भिक्खूने उपदेश केला. दंश करणे हा अखेरचा पर्याय आहे. मात्र तू स्वसंरक्षणार्थ विषदंत असल्याचे दाखवू शकतोस, भारतीय लष्कराने केलेली कारवाई ही स्वसंरक्षणार्थ विरोधकांना दाखवलेला विषदंतच होय.

बुद्ध तत्त्वज्ञानात युद्धाच्या कारणांचा विचार केला गेलेला आहे. बुद्धाने केलेल्या उपदेशात, आपल्या जनतेच्या हितासाठी आणि जीवितासाठी जर राजाने शस्त्र उचलले, तर ते त्याचे कर्तव्यच आहे, हे स्पष्ट होते. जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज आहे. हे निर्विवाद सत्य आहे. मात्र बुद्धाला विसरून युद्ध करता येत नाही. युद्धाचा उद्देशच दूषित असल्यास अश्रू, वेदना आणि हिंसेशिवाय हाती काही लागत नाही. बुद्ध वगळून युद्ध होत नाही.

ज्या बामियानमध्ये बुद्ध विचाराचा पराभव करण्याचा प्रयत्न झाला. त्या अफगाणिस्तानची परिस्थिती आज जगासमोर आहे. त्यासोबतच असत्याचा आधार घेऊन युद्ध लादणाऱ्यांवर जग विश्वास ठेवत नाही. पाकिस्तानची आज झालेली दयनीय अवस्था याच असत्यातून आलेली आहे. दहशतवादाला वारंवार पोसणाऱ्या या देशाला कोणीही साथ देण्यास आज तयार नाही.

हे त्या देशाच्या राष्ट्रप्रमुखाच्या भाषणातून स्पष्ट झाले आहे. युद्ध आणि युद्धाचे परिणाम या कार्यकारणभावाची साखळी तोडण्याची जबाबदारी पाकिस्तानवर आहे. मात्र त्यासाठी तेथील राज्यकर्त्यांना जगाशी सत्य बोलावं लागेल, तसेच स्वतःच्या देशातील लोकांशीही सत्य बोलावं लागेल. स्वतःच्या देशहितासाठी शस्त्रावरील खर्चापेक्षा शिक्षण आरोग्य पायाभूत सुविधा महत्त्वाच्या आहेत हे समजून घ्यावे लागेल.

तरच तेथे शांतता नांदू शकेल, आणि या शांततेचा परिणाम कार्यकारण सिद्धांतानुसार आपल्याही देशातील शांततेसाठी पोषक ठरेल. हिंसा आणि दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, तसेच सत्य आणि अहिंसा याही एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एका सोबत दुसरी येतेच, आज बुद्ध पौर्णिमेच्या या दिवशी भारताच्या शेजाऱ्यांना हे जरी समजले तरी जग आनंद आणि शांततेच्या मार्गाने जाऊ शकेल.

सर्व प्राणी सुखाच्या शोधात आहेत, त्यांना दुःख देऊ नये. युद्ध हा हिंसेचा सर्वात विनाशकारी प्रकार आहे, जो वैयक्तिक आणि सामाजिक स्तरावर दुःख निर्माण करतो, तो स्वतःच्या विनाशाला कारणीभूत ठरतो. तर दुसऱ्या बाजूला जो कोणी हिंसक मार्ग सोडून अहिंसक बनतो, तोच खरा विजेता आहे. पण अहिंसा ही दुर्बल असता कामा नये. अन्यथा त्याचा दुसऱ्यांकडून गैरफायदा घेतला जाऊ शकतो.

अर्थविस्ताराचे नवक्षितिज

आयातशुल्क आणि त्यातून उभ्या राहिलेल्या व्यापारयुद्धाने जगभरात संरक्षणवादी मानसिकता वाढीस लागत असतानाच भारत आणि ब्रिटन यांच्यात झालेला मुक्त व्यापार करार (एफटीए) हा अर्थविस्ताराची नवक्षितिजे खुली करणारा आहे. करारानुसार जवळपास ९९ टक्के भारतीय वस्तूंना ब्रिटनमध्ये शून्य आयातशुल्क लागेल. त्यामुळे भारतीय बनावटीचे कपडे, सागरी उत्पादने, चामडी वस्तू, खेळणी, दागिने आणि वाहनांचे सुटे भाग ब्रिटनमध्ये जम बसवू शकतात.

दुसरीकडे ब्रिटनमधील मद्य, आधुनिक उत्पादने, उपकरणे व सुटे भाग, चॉकलेट-बिस्किटे या वस्तूंना भारतीय बाजारपेठेत विस्तार करता येईल. काही दशकांपूर्वी खुल्या अर्थव्यवस्थेचे वारे वाहू लागले; त्या पार्श्वभूमीवर युरोपीय संघातून बाहेर पडण्याच्या ब्रिटनच्या धक्कादायक निर्णयानंतर विविध देशांशी स्वतंत्र व्यापार करारांची त्या देशाला आवश्यकता भासू लागली आहे. माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी भारताशी सुरू केलेल्या वाटाघाटींमध्ये तेथील राजकीय अस्थिरतेमुळे अनेकदा अडथळे आले.

अखेर चर्चेच्या १४ फेऱ्यांनंतर किअर स्टार्मर यांच्या कारकिर्दीत या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. युरोपीय संघातून बाहेर पडल्यानंतर ब्रिटनची अर्थव्यवस्था मोडकळीस आली असून, तेथे बेरोजगारीसारख्या समस्या उग्र झाल्या आहेत. त्यातच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयातशुल्क धोरणाचा ब्रिटनसह अनेक युरोपीय देशांना मोठा फटका बसणार आहे.

त्या पार्श्वभूमीवर नवनव्या बाजारपेठा शोधणे, ही ब्रिटनचीही गरज होती. दुसरीकडे भारतीय अर्थव्यवस्थे

शेवयांचा उपमा

सकाळचा नाश्ता म्हटले की, पोहे, उपमा, शिरा हे ठरावीक पदार्थ खायला मिळतात. एका सकाळी आपल्याला शेवयांचा उपमा करता येईल. खवय्यांना आवडेल अशी ही स्वादिष्ट डिश आहे.

साहित्य : शेवया, नारळ, मटार, चणाडाळ, टोमॅटो, लाल मिरची, गोडेतेल, कढीपत्ता, कांदे, मोहरी, हिंग, मीठ, जिरे.

कृती : कढईत शेवयांचा चुरा तांबूस रंग येईपर्यंत भाजा. भाजताना तेल नको. पाणी गरम करून ठेवा. एका पातेल्यात तेल गरम करून त्यात हिंग, मोहरी, जिरे, मिरच्यांचे तुकडे, कढीपत्ता, भिजलेली डाळ, कांदा, हळद सर्व टाकून लालसर होईपर्यंत परतून घ्यावे. त्यात गरम केलेले पाणी टाकून मीठ टाकावे. चवीला साखर, कोथिंबीर, नारळाचा चव घालून उकळावे. उकळलेल्या पाण्यात भाजलेल्या शेवयांचा चुरा घालावा व त्या शिजवाव्यात.

चेहऱ्यावर सुरकुत्या होण्या मागील मुख्य ७ कारणे

आपणासदेखील असं वाटत की आपले वय कमी आहे, पण सुरकुत्यांमुळे चेहऱ्यावरील चार्म गमावत आहे, तर त्यामागे बरीच कारणे असू शकतात. चला तर मग चेहऱ्यावर सुरकुत्या होण्यामागील कारणे जाणून घेऊया. सुरकुत्या सरत्या वयाचा एक भाग आहे. कॉलेजनचे उत्पादन वेळेनुसार कमी होतं, ज्यामुळे आपली त्वचा लवचिकता गमावून बसते. सरत्या वयासह सुरकुत्या होणे स्वाभाविकच आहे, पण अशी अनेक कारणे आहेत ज्यामुळे अकालीच सुरकुत्या दिसू लागतात. यामधील काही तर आपल्या दररोजच्या सवयीमुळे देखील असू शकत. जसे की साखरेचे सेवन किंवा सूर्याच्या प्रकाशात जास्त काळ राहिल्यामुळे आपल्या त्वचेवर फाईन लाइन्स दिसू लागतात. तथापि अद्याप उशीर झालेला नाही. आपण इच्छित असल्यास आपल्या दिनचर्येत आवश्यक बदल करून या सुरकुत्यांना चेहऱ्यावर येण्यापासून रोखू शकता.

आपल्या त्वचेला घासणे : जर आपण जोराने आपल्या चेहऱ्याला मेकअप वाईप किंवा टॉवेलने चोळत असाल किंवा आयलायनर लावण्यासाठी आपल्या डोळ्याच्या भोवतीच्या त्वचेला ताणत असाल, तर यामुळे देखील सुरकुत्या येऊ शकतात. वारंवार असे करण्याची सवय आपल्या त्वचेसाठी नुकसानदायी होऊ शकते.

पुरेशी झोप न घेणं : आपण झोप घेता त्यावेळी कॉर्टिसॉल(तणावाचे हार्मोन)ची पातळी स्वाभाविकरीत्या कमी होते. हे आपल्या त्वचेला दिवसभराच्या तणावापासून मुक्त होण्यासाठी नैसर्गिकरीत्या त्वचेला या चक्रातून जाऊ देतं. जर आपल्याला आवश्यक सौंदर्यवर्धक झोप मिळत नसेल तर आपण या चक्रात व्यत्यय आणत आहात. कॉर्टिसॉलचे उच्च स्तर कॉलेजन तोडून सुरकुत्या वाढवतात.

प्रदूषण : आपल्या सर्वांसाठी प्रदूषणाची वाढती पातळी वाईट आहे, हे तर सर्वांनाच माहीत आहे. धूर, धूळ आणि धुकं यापासून त्वचेच्या फ्री रॅडिकल्सला नुकसान होतं. यामुळे अकाली वृद्धत्व आणि सुरकुत्या येऊ लागतात. नकारात्मक प्रभावाला कमी करण्यासाठी दिवसाच्या शेवटी आपल्या चेहऱ्याला स्वच्छ करावे.

आपली झोपण्याची स्थिती : जर आपल्याला पोटावर किंवा हाताला उशीखाली दाबून झोपण्याची सवय असल्यास, बराच काळ असे केल्यानं आपल्या चेहऱ्यावर काही डाग येऊ शकतात. याचा परिणाम रात्रभर दिसून येत नाही, पण नंतर लक्षात येतो. यापासून वाचण्यासाठी पाठीवर झोपण्याचा प्रयत्न करा आणि त्वचेच्या सुरकुत्यांना कमी करण्यासाठी रेशीम किंवा सॅटिनची उशी वापरा.

उच्च साखरयुक्त आहार घेणं : साखर आपले वजन वाढवण्यात आणि त्वचेला अकाली वृद्ध करण्यात योगदान देते. साखर विरघळल्यावर ही ग्लायकेशन नावाच्या प्रक्रियेतून जाते. मुळात, ही कॉलेजन आणि इलॅस्टीनला बांधते आणि त्यांना कमकुवत करते. यामुळे फाईन लाइन्स आणि सुरकुत्या दिसून येतात.

सनस्क्रीन न लावणं : सूर्यापासून निघणारे यूव्ही किरण आपल्या त्वचेवरील सुरकुत्यांसाठी सर्वात जास्त जबाबदार असतात. असुरक्षित असणाऱ्या अल्ट्राव्हायोलेट प्रकाशाच्या संपर्कात येऊन कॉलेजन खराब होऊ शकतं, ज्यामुळे फाईन लाइन्स आणि सुरकुत्या होऊ शकतात. म्हणून आपल्या त्वचेला वाचवण्यासाठी नेहमी सनस्क्रीन वापरा.

डिहायड्रेड त्वचा : आपल्या त्वचेला सुरकुत्यांपासून वाचवण्यासाठी नेहमी हायल्युरोनिक ॲसिड असणाऱ्या उत्पादनांचा वापर करावा. हे आपल्या त्वचेतील ओलावा टिकवून ठेवते, ज्यामुळे डोळ्याच्या भोवती बनणाऱ्या फाईन लाइन्स कमी होतील. तसेच स्वत:लादेखील आतून हायड्रेट ठेवा. दिवसभरातून किमान ८ ग्लास पाणी पिण्याचा नियम बनवा.

प्रत्येक व्यक्तीला दररोज पुरेशी विश्रांती मिळणे आवश्यक असते. व्यक्तीनुसार झोपेचे प्रमाण बदलत असले तरीही चांगल्या आरोग्यासाठी किमान सात तासांची झोप घेणे आवश्यक असते. ही झोप सलग असली पाहिजे. झोपेमध्ये खंड पडला तर शरीराला त्याचा फारसा उपयोग होत नाही. अनेकांना रात्री जागरण करण्याची सवय असते. मात्र, ही सवय कालांतराने आरोग्यासाठी घातक ठरू शकते. झोप पूर्ण झाली नाही तर व्यक्तीच्या शरीरावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. अपुऱ्या झोपेमुळे उद्भवणारी काही लक्षणे पाहूयात...

अपुऱ्या झोपेमुळे होतात हे त्रास

■ **भावनिक अस्वस्थता :** पुरेशी झोप न झाल्यामुळे व्यक्ती विनाकारण चिडचिड करते. बऱ्याच काळापासून शरीराला आवश्यक असणारी विश्रांती मिळाली नाही तर त्याचा परिणाम व्यक्तीच्या भावनांवर होतो. त्यामुळे व्यक्तीचा मूड सातत्याने बदलत राहतो.

■ **विसरभोळेपणा :** योग्य तितकी झोप न झाल्यास व्यक्तीमध्ये विसरभोळेपणा वाढतो. याचे प्रमाण काही वेळा इतके वाढते की अगदी काही काळापूर्वी तुम्ही केलेली गोष्टही तुम्हाला सहज आठवेनाशी होते.

■ **नवीन गोष्टी शिकण्यात अडथळे :** अपुरी झोप ही तुमच्या स्मरणशक्तीवर परिणाम करते. झोप झाली नसल्यास मेंदूला जास्त ताण द्यावा लागतो आणि त्यामुळे नवीन गोष्टी शिकण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते.

■ **अकाली वृद्धत्व :** आपण लवकर वयस्कर व्हावे असे कोणत्याच व्यक्तीला वाटत नाही. मात्र पुरेशी झोप न झालेल्या व्यक्तींच्या त्वचेवर लवकर सुरकुत्या पडतात. त्यामुळे व्यक्ती वयस्कर दिसू लागतात.



■ **लठ्ठपणा :** पुरेशी झोप न झालेल्या व्यक्तींचे शारीरिक गणित बिघडते. अन्नाचे योग्य प्रकारे पचन होत नाही. तसेच त्यांना वारंवार भूक लागण्याचीही शक्यता असते. त्यामुळे लठ्ठपणा वाढू शकतो.

■ **कर्करोग होण्याची शक्यता :** अपुऱ्या झोपेमुळे आपल्या शरीराचे नव्हे तर मेंदूचे कार्यही बिघडते. अपुरी झोप ही प्रोस्टेट कर्करोग, स्तनांचा कर्करोग यांसारख्या आजारांना कारणीभूत ठरू शकते.

■ **कमी प्रतिकारशक्ती :** अपऱ्या झोपेमुळे शरीरातील प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. त्यामुळे अशा लोकांना संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता जास्त असते.

इन्स्टाग्रामवरून करायचा आहे का व्हिडीओ कॉल, मग फॉलो करा या स्टेप्स

इन्स्टाग्रामवर व्हिडीओ कॉलिंग हे जबरदस्त फीचर जोडण्यात आलं आहे. याच्या माध्यमातून तुम्ही व्हिडीओ कॉल करून तुमच्या मित्रांशी संवाद साधू शकता.

इन्स्टाग्राम आपल्या कंटेंट आणि फीचर्सच्या जोरावर सध्या एक लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्म बनलं आहे. या प्लॅटफॉर्मवर फोटो आणि व्हिडीओ शेअर करण्यासोबतच व्हिडीओ कॉलदेखील करता येतो. जर तुम्हालादेखील हे फीचर वापरायचं असेल आणि जर तुम्हाला पद्धत माहीत नसेल तर टेंशन घेऊ नका. आम्ही तुम्हाला या आर्टिकलमध्ये व्हिडीओ कॉल करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्यामुळे तुम्ही तुमच्या मित्र-मैत्रिणींशी फेस-टू-फेस संवाद साधू शकता.

इन्स्टाग्राममध्ये अशाप्रकारे करा व्हिडीओ कॉल

- तुमच्या मोबाईलमध्ये इन्स्टाग्राम ॲप ओपन करा.
- उजवीकडे असलेल्या मेसेज आयकॉनवर क्लिक करा.
- चॅट लिस्टमधून तो कॉण्टॅक्ट निवडा, ज्याला तुम्हाला व्हिडीओ कॉल करायचा आहे.
- त्यानंतर उजवीकडे असलेल्या कॅमेरा आयकॉनवर क्लिक करा.
- त्यानंतर व्हिडीओ कॉल सुरू होईल.
- अशाप्रकारे तुम्ही व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून तुमच्या मित्र-मैत्रिणींशी बोलू शकता.

व्हिडीओ कॉल दरम्यान तुम्ही काय करू शकता...

- व्हिडीओ कॉलदरम्यान तुम्ही फोनचा कॅमेरा स्विच करू शकता.
- मायक्रोफोन आयकॉनवर क्लिक करून तुम्ही माइक म्यूट करू शकता.
- स्माइली फेस आयकॉनवर टॅप करून तुम्ही व्हिडीओ कॉलमध्ये इफेक्ट ॲड करू शकता.

लक्षात असू द्या व्हिडीओ कॉल करण्यापूर्वी वाय-फाय किंवा डेटा कनेक्शन सुरळीत असेल याची काळजी घ्या. ज्यामुळे तुम्ही अगदी सहज व्हिडीओ कॉलिंग करू शकाल. तसेच तुम्हाला व्हिडीओ क्वालिटीदेखील चांगली मिळेल. विशेष म्हणजे कॉलिंग दरम्यान तुम्ही ४ लोकांना जोडू शकता आणि चार लोकांशी एकाचवेळी बोलू शकता. महत्त्वाची बाब म्हणजे ज्यांना व्हिडीओ कॉल करायचा आहे, त्यांनी इन्स्टाग्राम नोटिफिकेशन ऑन केलेल्या असाव्यात, तसेच ते ऑफलाइन असल्यास व्हिडीओ कॉल नोटिफिकेशन त्यांना जाणार नाहीत. सोशल मीडिया ॲप इन्स्टाग्रामनं गेल्या वर्षी किशोरवयीन मुलांचा विचार करून नाइट टाइम नज फीचर लॉंच केलं होतं. ही सुविधा रिमाइंडरप्रमाणे चालते. जेव्हा किशोरवयीन मुलं ॲपवर १० मिनिटांपेक्षा वेळ घालवतील तेव्हा त्यांना ॲप बंद करण्याचा रिमाइंडर मिळेल.

पोटाचा घेर कमी करायचा आहे? मग जाणून घ्या घोसाळी खाण्याचे फायदे

गौरी–गणपतीसारखे सण, उत्सव आले की अनेक घरांमध्ये घोसाळ्याच्या भज्यांचा वास घमघमू लागतो. साधारणपणे आपल्याला कांदाभजी, बटाटाभजी, पालकभजी असे भज्यांचे प्रकार माहीत आहेत. मात्र, या सगळ्यांमध्ये घोसाळ्याची भजीदेखील तितकीच खुमासदार लागतात. बऱ्याच वेळा घोसाळ्याची भजी खाण्यासाठी लोक नाकं मुरडतात. मात्र,

घोसाळ्याची भजी किंवा भाजी खाण्याचे अनेक फायदे आहेत. मुळात घोसाळं हे शरीरासाठी अत्यंत गुणकारी आहे. त्यामुळे त्याचे नेमके फायदे कोणते ते जाणून घेऊयात.

▮लघवी साफ होते. ▮कफ झाल्यास घोसाळ्याचा रस प्यावा. त्यामुळे उलटी होऊन कफ बाहेर पडतो. ▮पोट साफ होतं. ▮जखम बरी होते. ▮पोटाचा घेर कमी होतो. ▮मूतखड्यावर गुणकारी ▮थकवा दूर होतो.

जपा संत्र सेवनाचा मंत्र !

संत्री खाताना काळजी घ्यावी. सर्दी, खोकला झाला असेल तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये, त्यामुळे खोकला अधिकच वाढू शकतो. आंबट गोड चवीची, पिवळ्या केशरी रंगाची संत्री सगळ्यांच्या आवडीची असतात. संत्र्यात भरपूर प्रमाणत 'अ', 'ब' आणि 'क' जीवनसत्त्व असतं. साधारण थंडीत संत्र्यांचा हंगाम सुरू होतो. महाराष्ट्रात नागपूरमध्ये संत्र्याचं पीक मोठ्या प्रमाणात घेतलं जातं. संत्र्यापासून ज्यूस, जॅम, जेली, अत्तर , सुगंधी तेल, चूर्ण असे अनेक पदार्थ तयार केले जातात. पण फक्त खाद्यपदार्थ किंवा सौंदर्य पदार्थच नाही, तर आरोग्याच्या अनेक समस्यांवर संत्रे फायदेशीर आहे. चला तर या संत्र्याचे फायदे जाणून घेऊयात.

■ भूक मंदावणे, पोटात गॅस होणे अशा समस्यांवर संत्र्याचा रस प्यायल्यास खूप आराम पडतो.

■ मळमळल्यासारखं होत असल्यास संत्र्याची साल हुंगल्यास लगेच आराम पडतो.

■ पचनशक्ती वाढवण्यासाठी संत्र खावे.

■ मलावरोधाचा त्रास होत असल्यास रात्री झोपण्यापूर्वी संत्र्याच्या फोडी पांढऱ्या सालीसकट खाव्यात, सालीतील तंतुमय पदार्थामुळे शौचास साफ होते.

■ संत्र्यामध्ये असणाऱ्या 'क' जीवनसत्त्वामुळे दातांच्या अनेक समस्या दूर होतात.

■ थकवा, अशक्तपणा जाणवत असल्यास संत्रे खावे.

■ हंगाम संत्री आवर्जून खावी, कारण त्वचेचे सौंदर्य सुधारण्यासाठी संत्रे मदत करते.

■ संत्रे ही थंड असतात. अति उष्णतेचा त्रास झाल्यास संत्र्याचा रस प्यावा.

■ संत्र्याची साल वाळवून त्यापासून चूर्ण तयार करावे. हे सूक्ष्म चूर्ण चेहऱ्यावर लावल्यास मुरुमे व पुटकुळ्या दूर होऊन त्वचा कांतियुक्त होते.

■ संत्र्याच्या नियमित सेवनामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पण संत्री खाताना काळजी घ्यावी, सर्दी, खोकला झाला असेल तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये, त्यामुळे खोकला अधिकच वाढू शकतो.

व्यायामापूर्वी अशी घ्या त्वचेची काळजी

आपण आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व्यायाम करतो. पण त्यामध्ये आपल्या त्वचेची काळजी घेतली जात नाही. असे बरेच कमी लोक असतात, जे वर्क आऊट्सच्या पूर्वी आपल्या त्वचेची योग्यरीत्या काळजी घेतात. असं करणं फार महत्त्वाचं असत. कारण वर्क आऊट्सच्या दरम्यान भरपूर घाम येतो आणि जर आपली त्वचा स्वच्छ नसेल तर घाणेरड्या त्वचेवर घामामुळे बॅक्टेरिया अधिक वाढू शकतात. याशिवाय व्यायामाच्या दरम्यान आपल्या त्वचेचे निर्जलीकरण होते. चला तर मग आज आम्ही आपल्याला सांगत आहोत की, व्यायामापूर्वी त्वचेची काळजी कशी घ्यावी...

त्वचा तज्ञ म्हणतात की, जेव्हा आपण वर्क आऊटसाठी जात असाल तेव्हा मेकअपपासून शक्य असेल तेवढे वाचावे. हे आपल्या छýi आणि घामाच्या ग्रंथींना अवरोधित करतात, यामुळे आपल्या त्वचेला श्वास घ्यायला अडचण होते. म्हणून आपण वर्क आऊट करायला जाण्यापूर्वी आपल्या त्वचेला चांगल्या प्रकारे स्वच्छ करून घ्या. यासाठी आपण एखाद्या फेसवॉशने चेहरा स्वच्छ करणे अधिक चांगले राहील.

मॉइश्चरायझिंग करणे आवश्यक

त्वचेची काळजी घेणारे तज्ञ म्हणतात की, त्वचा स्वच्छ केल्यावर तिला मॉइश्चराइझ करणे देखील आवश्यक आहे. वास्तविक वर्क आऊट्स दरम्यान आपल्या त्वचेमधून भरपूर घाम येतो, जे आपल्या त्वचेचे निर्जलीकरण करतो. अशा परिस्थितीत त्वचेचा ओलावा टिकवून ठेवण्यासाठी मॉइश्चराइझ करणं आवश्यक असतं. म्हणून जेव्हा आपण आपला चेहरा स्वच्छ कराल तेव्हा आपल्या चेहऱ्यावर मॉइश¨ रायझर आणि लिप बाम लावा, कारण वर्क आऊट केल्यावर आपले ओठ कोरडे होतात आणि फाटतात.

एसपीएफ संरक्षणाला दुर्लक्षित करू नका : त्वचा तज्ञ म्हणतात की, प्री-वर्क आऊट त्वचेची काळजी घेताना सूर्याच्या किरणांपासून संरक्षण करणे देखील महत्त्वाचे आहे. जर आपण वर्क आऊट दरम्यान मैदानी व्यायाम करण्याची योजना आखत असाल, तर जसे की बागेत जाऊन धावणे किंवा बाहेरच योगा करत असाल तर बाहेर जाण्यापूर्वी सनस्क्रीन लावणे विसरू नका.

ॲंटिपर्सीपरंट लावा : हे खरे आहे की आपल्याला व्यायामशाळेत किंवा वर्क आऊट्स करताना खूप घाम गाळावा लागतो. तर आपल्या बगलेला ॲंटिपर्सीपरंट रोलऑन करून बॅक्टेरिया आणि जंताचे घर होण्यापासून संरक्षण करा.

हरभरा खाण्याचे 'हे' फायदे वाचून व्हाल चकित!

हिवाळा ऋतू सुरू झाला की बाजारात ऊस, संत्री, गाजर, हरभरा, आवळे अशी फळे दिसू लागतात. या सगळ्यामध्ये अनेकांचं लक्ष वेधून घेतो तो म्हणजे हरभरा. हिरवागार हरभरा पाहिला की महिला वर्गाच्या डोक्यात अनेक वेगवेगळ्या भन्नाट रेसिपी घुमू लागतात. मग संपूर्ण हिवाळा ऋतू संपेपर्यंत ओल्या हरभऱ्याची चटणी, घावणं, पाल्याची भाजी असे वेगवेगळे प्रकार प्रत्येकाच्या स्वयंपाक घरात होऊ लागतात. या ओल्या हरभऱ्याचे अनेक गुणकारी फायदे आहेत. विशेष म्हणजे केवळ ओल्या हरभऱ्याचेच नव्हे, तर चणे किंवा हरभरा डाळीचं पीठ (चणाडाळीचं पीठ) हेदेखील शरीरासाठी बहुगुणी ठरत असल्याचं दिसून येतं.

■ हरभऱ्यामध्ये मॅलिक ॲसिड, ऑक्झालिक ॲसिड यांचं प्रमाण असल्यामुळे आम वांत्या (उलटी), अपचन या समस्या दूर होतात.

■ हरभरा स्नायूवर्धक आहे. त्यामुळे व्यायाम करणाऱ्यांनी हरभऱ्याचं नियमित सेवन केल्यास फायदेशीर ठरू शकतं.

■ ओल्या हरभऱ्याच्या पानांमध्ये लोहाचं पुरेपूर प्रमाण असतं. त्यामुळे शरीरात लोहाची कमतरता असलेल्या व्यक्तींनी हरभऱ्याच्या पानांची भाजी खावी.

■ कोणत्याही प्रकारचा त्वचाविकार असल्यास हरभरा डाळीचे पीठ प्रभावी जागेवर लावावे.

■ डाळीच्या पिठाने रंग उजळतो. चेहऱ्यावर मुरुमे असतील तर एक चमचा दही घेऊन त्यात थोडंसं डाळीचं पीठ घालावं. त्यानंतर हा लेप चेहऱ्यावर लावावा. यामुळे चेहऱ्यावरील मुरुमं कमी होतात.

■ केस रुक्ष किंवा कोरडे असतील तर डाळीच्या पिठाने केस धुवावेत.

■ घाम येऊन शरीरातून दुगËÊfी येत असल्यास अंघोळ करताना डाळीच्या पिठाचा लेप लावावा.

'या' व्यक्तींनी हरभरा खाऊ नये

▮हरभरा डाळ पचण्यास जड आहे. तसंच ती उष्ण, तुरट-गोड चवीची आहे. त्यामुळे वातदोष वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच, वातप्रकृतीच्या व्यक्तींनी हरभरा डाळ किंवा हरभऱ्याचं सेवन करू नये.

▮हरभरा पचण्यास जड आहे. त्यामुळे पचनशक्ती मंद असणाऱ्यांनी किंवा अपचनाचा त्रास होणाऱ्यांनी हरभऱ्याचं सेवन टाळावं. तसंच डाळीच्या पिठापासून केलेले पदार्थ देखील जास्त खाऊ नयेत.

नावडते असले तरी आठवड्यातून एकदा कारले खावेच!

'कडू कडू कारले, बाजारात फिरले त्याला पाहून नाक भेंडीने मुरडले'. लहानपणी भाज्यांवर आधारित एका 'बडबड गीता'मध्ये कारल्याचे वर्णन अशाप्रकारे केले होते. कारले किंवा कारल्याची भाजी म्हटली की सगळेच नाक मुरडतात, पण ही कारली कितीही कडू असली तरी आरोग्य मात्र उत्तम ठेवतात. कारल्यामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस 'अ', 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. आपल्याकडे कारल्याची भाजी सहसा कोणी करत नाही, केलीच तर मीठ टाकून तिच्यामध्ये असलेले सारे पौष्टिक घटक काढून टाकतात. कारल्यातलं पाणी काढून टाकलं की ती कमी कडू लागते, असा अनेक गृहिणींचा समज आहे. पण, यामुळे भाजीतील जीवनसत्त्व पूर्णपणे वाया जाते याची कल्पना त्यांना नसते. कारल्याला आयुर्वेदात खूप महत्त्व आहे. फक्त भाजीसाठीच नाही तर औषधांमध्येही कारल्याचा वापर केला जातो. कारले कितीही नावडते असले तरी आहारात आठवड्यातून किमान एकदा तरी या फळभाजीचा समावेश असलाच पाहिजे.

कारल्याचे फायदे

■ कारल्याच्या रसामुळे रक्त शुद्ध होते, त्यामुळे त्वचाविकार होण्याचा धोका कमी होतो.

■ कावीळ झाल्यास ताज्या कारल्यांचा रस सकाळ-संध्याकाळ घेतल्यास यामुळे कावीळ दूर होते.

■ यकृताच्या सर्व विकारांमध्ये कारल्याचा रस फायदेशीर असतो.

■ जंत किंवा कृमींचा त्रास असल्यास कारल्याची भाजी किंवा रस घेतल्यानं कृमींचा त्रास कमी होतो.

■ दमा, सर्दी, खोकल्याचा त्रास असेल तर कारल्याचा रस व तुळशीच्या पानांचा रस एकत्र करून त्यात मध मिसळून महिनाभर घेतल्यास रोगप्रतिकार शक्ती वाढून हे त्रास दूर होतात.

रात्री चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ

निरोगी आणि सुदृढ आरोग्य हवं असेल तर आहारात पौष्टिक पदार्थांचा समावेश करा, असा सल्ला कायमच डॉक्टरांकडून दिला जातो. त्यासोबत सकाळचा नाश्ता भरपेट करावा, दुपारचं जेवण थोडं कमी करावं आणि रात्रीचं जेवण अत्यंत हलकं घ्यावं, असंही म्हटलं जातं. मात्र, अनेकदा आपण याकडे दुर्लक्ष करतो. अनेकदा काही जण रात्रीच्या जेवणात मसालेदार पदार्थ, फास्टफूड यांचा समावेश करतात.मात्र, ते शरीरासाठी अत्यंत चुकीचं आहे. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी कोणत्या पदार्थांचं सेवण करणं टाळलं पाहिजे, हे जाणून घेऊयात.

भात : अनेकांना रात्री भात खाल्ल्याशिवाय झोप येत नाही. मात्र, रात्रीच्या वेळी भात खाल्ल्यामुळे शरीरात अतिरिक्त चरबी निर्माण होण्याची शक्यता असते. रात्री भात खाल्ल्याने पोटाकडील चरबी वाढते.

फास्ट फूड/तेलकट पदार्थ : पिझ्झा, बर्गर, फ्राईज यासारखे फास्ट फूड आणि तळलेले पदार्थ रात्रीच्या वेळी खाणे टाळा. अपचन किंवा ॲसिडिटीमुळे निद्रानाश होऊ शकतो.

चॉकलेट : काही जणांना रात्री जेवण झाल्यावर गोड खाण्याची सवय असते. त्यामुळे बऱ्याच वेळा चॉकलेट खाल्लं जातं. मात्र, चॉकलेट हे कितीही आवडीचे असले तरी झोपण्यापूर्वी ते खाऊ नका. कारण चॉकलेट्समध्येही काही प्रमाणात कॅफेन असते. तेव्हा रात्रीच्या वेळी चॉकलेटच्या अतिसेवनामुळे झोपेवर परिणाम होऊ शकतो.

मांसाहारी पदार्थ : रात्रीच्या वेळी मांसाहार पूर्णपणे वर्ज्य करावा. कारण, मांस पचायला २४ ते ७२ तासांचा कालावधी लागतो. यामुळे वजन तर वाढतेच, पण रात्री अपचनामुळे झोपमोडही होऊ शकते. तेव्हा मांसाहार करणे टाळा.

चायनीज पदार्थ : चायनीज पदार्थांमध्ये एमएसजी अर्थात मोनोसोडियम ग्लुटामेट असते. आरोग्याच्या दृष्टीने तो घातक असतोच पण त्यामुळे निद्रानाशही होऊ शकतो.

दरम्यान, रात्री जेवण केल्यानंतर एक-दोन तासांतच आपण झोपी जातो, त्यामुळे पचनक्रिया मंदावते. अशावेळी फारच कमी खाणे किंवा हलके-फुलके खाणे फायद्याचे ठरेल. अनेक पदार्थ हे पचायला जड असतात, त्यामुळे रात्री शक्यतो कमी खाण्याचा सल्ला दिला जातो. तेव्हा रात्री जेवताना काही पदार्थ खाणे हे आवर्जून टाळले पाहिजे.

महापालिकेवर सायबर हल्ला?

वेबसाईटवर 'YOU HAVE BEEN HACKED' चा संदेश झळकला!

■**उल्हासनगर :** उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर शनिवारी दुपारी एक धक्कादायक प्रकार समोर आला. वेबसाइटच्या डॅशबोर्डवर "ALLAH HU AKBAR - YOU HAVE BEEN HACKED" असा मजकूर झळकला आणि काही काळासाठी प्रशासनासह नागरिकांमध्ये खळबळ उडाली. या प्रकरणात पाकिस्तानी हॅकर्सचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, पालिकेच्या आयटी टीमने तत्काळ प्रतिक्रिया देत सायबर हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडल्याचा दावा केला आहे.

शनिवारी दुपारी सुमारे १.३० वाजता उल्हासनगर महापालिकेच्या वेबसाईटवर अनधिकृत प्रवेश झाल्याची चिन्हे दिसून आली. या वेळेस वेबसाइटवर एक भडक संदेश झळकत होता, ज्यामध्ये धार्मिक घोषणा आणि 'YOU HAVE BEEN HACKED' असा मजकूर स्पष्टपणे लिहिला होता. ही बाब महापालिकेच्या आयटी विभागाच्या प्रमुख श्रद्धा बाविस्कर यांच्या निदर्शनास आली आणि तातडीने आयुक्त मनीषा आव्हाळे यांना याची माहिती देण्यात आली.

आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या आदेशानंतर उल्हासनगर महापालिकेची टेक्निकल टीम सजग झाली. वेबसाईट ऑफलाइन केली गेली असून सध्या संपूर्ण तपास सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, हॅकिंगचा हा प्रयत्न परकीय सायबर गुन्हेगारी गटांकडून (विशेषतः पाकिस्तानी हॅकर्स) झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

> "उल्हासनगर पालिकेच्या वेबसाईटवर झालेल्या सायबर हल्ल्याचा प्रकार गंभीर असून, आमच्या आयटी विभागाने तत्काळ कृती करत तो प्रयत्न निष्फळ केला आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये व अधिकृत माहितीची वाट पाहावी. सायबर सुरक्षेबाबत महापालिका पूर्ण सज्ज आहे."
>
> **-मनीषा आव्हाळे, (आयुक्त, उल्हासनगर महापालिका)**

जनसंपर्क अधिकारी अजय साबळे यांनी सांगितले की, ह्महापालिकेच्या वेबसाईटवर हॅकिंगचा प्रयत्न झाला आहे, वेबसाइट तात्पुरती बंद करण्यात आली असून टेक्निकल टीम तपास करत आहे. यासंदर्भातील अधिकृत माहिती लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.ह्व

उल्हासनगर महापालिकेने यासंदर्भात जनजागृती करत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, अज्ञात वेबसाईट्सवर माहिती देऊ नये, किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. संपूर्ण प्रकरणावरून हे स्पष्ट होते की, सायबर हल्ले ही भविष्यातील महत्त्वाची सुरक्षा आव्हाने ठरणार आहेत. यासाठी स्थानिक प्रशासनासह नागरिकांचीही जागरूकता तितकीच आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

अनुदान रखडल्याने पालिकेवर आर्थिक संकट

कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत प्रश्नचिन्ह

जीएसटी अनुदान रखडले

मागील आर्थिक वर्षात महापालिकेने शासनाकडून जीएसटी अनुदानापोटी ११४२ कोटींची रक्कम मिळाली होती. परंतु आता नवीन आर्थिक वर्ष सुरू होताच, सरत्या आर्थिक वर्षातील मार्च आणि नव्या आर्थिक वर्षातील एप्रिल महिन्याची रक्कम अद्यापही पालिकेला मिळू शकलेली नाही, ही रक्कम १९६ कोटींच्या आसपास आहे. ही रक्कम मिळावी, यासाठी महापालिकेने पत्रव्यवहार केला आहे. परंतु मे महिना अर्धा होत आला असतांनाही अद्यापही पालिकेला अनुदानाची ही रक्कम प्राप्त होऊ शकलेली नाही.

■**ठाणे :** अपुरे उत्पन्न आणि वाढत्या विकासकामांमुळे रिक्त झालेली तिजोरी यामुळे पालिकेची आर्थिक घडी विस्कटलेली आहे. उत्पन्न आणि खर्च यांच्यातील दरी वाढत असताना जीएसटी अनुदानापोटी मिळणाऱ्या अनुदानावर महापालिकेची आर्थिक भिस्त असते मात्र अद्याप ही शासनाकडून जीएसटी अनुदानापोटी मिळणाऱ्या १९६ कोटी रक्कम प्राप्त न झाल्याने पालिकेवर आर्थिक संकट कोसळण्याची भिती आहे. अनुदान प्राप्त झाले नाही तर पुढील महिन्यात पालिका कर्मचाऱ्यांच्या पगारावर टांगती तलवार असणार आहे.

ठाणे महापालिकेची विस्कटलेली आर्थिक घडी बसविण्यासाठी महापालिका आता टप्याटप्याने बिनव्याजी कर्ज घेत आहे. मात्र त्यातून विकासकामे आणि ठेकेदारांची बिले अदा केली जाणार आहेत. परंतु दुसरीकडे महापालिकेला कर्मचाऱ्यांच्या पगार व इतर कामांसाठी आजही शासनाच्या अनुदानावरच अवलंबून राहावे लागत आहे. अशातच मागील दोन महिन्यापासून ठाणे महापालिकेला जीएसटी अनुदानापोटी मिळणारी १९६ कोटी अद्यापही प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे पुढील महिन्यात पुन्हा कर्मचाऱ्यांचा पगार निघेल का नाही? याची चिंता पालिकेला सतावू लागली आहे.

ठाणे महापालिकेत महापालिकेचे ६५०९, शिक्षण विभागाचे ६९७, महापालिका कंत्राटी ७३, अनुकंपा ६६ व इतर २३३ असे ७ हजार ५७८ कर्मचारी कार्यरत आहेत. तर परिवहनचे सुमारे १६०० च्या आसपास कर्मचारी आहेत. याशिवाय खासगी कंत्राटदाराचे २५००च्या आसपास कर्मचारी पालिकेत कार्यरत आहे. शासनाकडून महापालिकेला यापूर्वी ८० कोटींच्या आसपास अनुदान दरमहा मिळत होते. मागील जून महिन्यात त्यात वाढ झाल्याचे दिसून आले. त्यात आता वाढ होऊन ही रक्कम ९८ झाले आहे. याच अनुदानातून पालिकेतील कर्मचाऱ्यांचे पगार, टीएमटीचा खर्च व इतर खर्च भागवले जात आहेत. तसेच वीज, पाणी, डिझेल, पेट्रोल हा खर्च ६ कोटींच्या आसपास केला जात आहे. एकूणच पगारापोटी व इतर खर्च हा ११० कोटींच्यावर जात आहे. यात टीएमटीला दरमहा १६ कोटी द्यावे लागत आहेत. पेन्शनपोटी १७ कोटी, शिक्षण विभाग ५ कोटी असा खर्च करावा लागत आहे. त्यातही पालिकेचे शिक्षण विभाग धरून ६ हजार ७०० च्या आसपास कर्मचारी आहेत. मिळणाऱ्या अनुदानापेक्षा हा खर्च जवळ जवळ १५ कोटींनी वाढल्याचे दिसत आहे.

जीएसटीच्या रकमेवरच पालिकेतील कर्मचाऱ्यांचा पगार, टीएमटीची देणी दिली जात आहेत. परंतु आता हे अनुदान न आल्याने त्याचा परिणाम पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पगारावर होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. या महिन्यात ही रक्कम आली नाही तर मात्र पालिकेच्या कर्मचाऱ्यांचा पगार जून महिन्यात लांबणीवर जाण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे.

सागरी सुरक्षा रचनेत बदले

नोव्हेंबर २००८ मध्ये झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर - ज्यामध्ये लष्कर-ए-तैयबा (एलईटी) च्या १० आत्मघाती हल्लेखोरांनी मुंबईवर हल्ला केला होता आणि त्यात १६८ लोक ठार झाले होते सागरी सुरक्षा रचनेत एक मोठा बदल झाला. कोणत्याही उदयोन्मुख परिस्थितीला प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी विविध भागधारकांमध्ये हवाई देखरेख, गुप्तचर माहिती मिळविणे आणि माहिती सामायिकरण यासारख्या देखरेखीवर वाढ झाली. फेब्रुवारी २००९ मध्ये, आयसीजीला प्रादेशिक पाण्यातील किनारी सुरक्षेसाठी जबाबदार प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले. यामध्ये तटीय पोलिसांद्वारे गस्त घालण्याचे क्षेत्र समाविष्ट होते तर सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीच्या कार्यवृत्तांनुसार नौदलाला सागरी संरक्षणाची जबाबदारी सोपवण्यात आली.

सागरी सुरक्षेसाठी 'डोळे व कान' बना... मच्छिमारांसाठी राज्य शासनाचे आवाहन

■**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने पालघर किनाऱ्यावर काम करणाऱ्या मच्छिमारांना 'सुरक्षा निर्देश' जारी केले आहेत आणि भारत-पाक संघर्ष सुरू असताना देशाची सागरी सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांना सतर्क राहण्यास सांगितले आहे, असे एका अधिकाऱ्याने येथे सांगितले. किनारी देखरेख वाढवण्याबाबत भारतीय नौदलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीनंतर हे निर्देश जारी करण्यात आले आहेत, असे त्यांनी शुक्रवारी पीटीआयला सांगितले. राज्य सरकार बहुतेक मासेमारी बोटींमध्ये ट्रान्सपॉन्डर बसवण्याचा प्रयत्न करत आहे जेणेकरून त्यांचे ठिकाण ट्रॅक करता येईल. अधिकाऱ्यांनी पालघर किनाऱ्याजवळ -

मुंबईच्या उत्तरेला - दोन ठिकाणे ओळखली आहेत जिथे मच्छिमार नियमितपणे जमतात आणि त्यांना तेथे जमू नये असे आवाहन केले आहे, असे सरकारी अधिकाऱ्याने सांगितले. आम्ही मच्छिमारांना नौदल सुरक्षेसाठी डोळे आणि कान म्हणून काम करण्याचे आणि समुद्रात कोणत्याही संशयास्पद हालचालींबद्दल अधिकाऱ्यांना सतर्क करण्याचे आवाहन केले आहे, असे ते म्हणाले. नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईवर हल्ला करणाऱ्या पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय मासेमारी बोटीचे अपहरण केले होते आणि संशय निर्माण न करता देशाच्या पाण्यात प्रवेश करण्यासाठी त्याचा वापर केला होता. आजही, पालघर जिल्ह्यातील अनेक मासेमारी नौका पाकिस्तानी सागरी अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहेत, कारण त्या देशाच्या पाण्यात प्रवेश केल्याचा आरोप आहे आणि त्यांचा गैरवापर होऊ शकतो, असे अधिकाऱ्याने सांगितले. त्यांनी सांगितले की, मच्छिमारांना अशी कोणतीही हरवलेली बोट आढळल्यास त्वरित अधिकाऱ्यांना कळवण्यास सांगण्यात आले आहे.

पनवेल आणि कळंबोली दरम्यान चार दिवस ब्लॉक... लांब पल्ल्याच्या गाड्या विलंबाने धावणार

■**मुंबई :** कळंबोली रेल्वे फ्लाय-ओव्हरवर ओपन वेब गर्डरच्या कामासाठी चार दिवस ब्लॉक घेण्यात आला आहे. रविवार, मंगळवार, बुधवार आणि शुक्रवारी मध्यरात्री हा ब्लॉक घेतला आहे. यामुळे अनेक लांबपल्ल्याच्या गाड्या विलंबाने धावणार आहेत.

ओपन वेब गर्डरच्या लाँचिंगसाठी रविवार ११ मे, मंगळवार १३ मे, बुधवार १४ मे, शुक्रवार १६ मे रोजी कळंबोली येथे विशेष वाहतूक आणि पॉवर ब्लॉक घेतला आहे. गर्डर लॉचिंग रविवारी रात्री १.२० ते ४.५० वाजेपर्यंत ब्लॉक असेल. यामुळे ट्रेन क्रमांक १२१३४ मंगळुरू जंक्शन-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अतिजलद एक्स्प्रेस सोमटने येथे २.५८ तास ते ४.३० तासांपर्यंत नियंत्रित केली जाईल. तर ट्रेन क्रमांक २०११२ मडगाव - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कोकणकन्या एक्स्प्रेस ४.०२ तास ते ४.५० तासांपर्यंत पनवेल येथे नियमित केली जाईल.

ट्रेन क्रमांक १०१०३ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - मडगाव मांडवी एक्स्प्रेस छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ५० मिनिटांनी सुटेल.

ट्रेन क्रमांक २२१९३ दौंड - ग्वाल्हेर अतिजलद एक्स्प्रेस कर्जत - कल्याण - भिवंडी रोड मार्गे वळवली जाईल आणि पनवेल येथे थांबा दिला जाईल. दुसरा ब्लॉक मंगळवारी मध्यरात्री घेतला आहे. रात्री १.२० ते ४.२० या वेळेत हा ब्लॉक असेल. या कालावधीत अनेक गाड्यांचे नियमन करण्यात आले आहे. ट्रेन क्रमांक १२१३४ मंगळुरू जंक्शन - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अतिजलद एक्स्प्रेस सोमटने येथे २.५८ तास ते ४.१० तासांपर्यंत नियंत्रित केली जाईल. ट्रेन क्रमांक २०११२ मडगाव - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कोकणकन्या एक्स्प्रेस ४.०२ तास ते ४.२० तासांपर्यंत पनवेल येथे नियंत्रित केली जाईल. तिसरा ब्लॉक बुधवार १४ मे रोजी घेण्यात आला आहे. या कालावधीत ट्रेन क्रमांक २२६५५ एरणाकुलम जंक्शन- हजरत निजामुद्दीन अतिजलद एक्स्प्रेस पनवेल येथे रात्री २.५० ते पहाटे ४ वाजेपर्यंत नियंत्रित केली जाईल.

ट्रेन क्रमांक १२१३४ मंगलूरू जंक्शन- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अतिजलद एक्सप्रेस २.५८ तास ते ३.५० तासांपर्यंत आपटा येथे नियंत्रित केली जाईल.

चौथा ब्लॉक १६ मे रोजी रात्री २ ते पहाटे ४ वाजेपर्यंत असेल. या कालावधीत ट्रेन क्रमांक १२१३४ मंगलूरू जंक्शन-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अतिजलद एक्सप्रेस रात्री ३.११ ते ४.०० वाजेपर्यंत आपटा येथे नियमित केली जाईल.

भिवंडीतील वडपे गावात भीषण आग

२२ गोदामे जळून खाक, अनेक कंपन्यांचे मोठे नुकसान

■**ठाणे :** भिवंडी तालुक्यातील वडपे गावातील रिचलँड कंपाउंड परिसरात आज (१२ मे) सकाळी भीषण आग लागली. या आगीत एकूण २२ गोदामे जळून खाक झाली असून, पाच मोठ्या कंपन्या आणि एका मंडप सजावटीच्या गोदामाचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच भिवंडी आणि कल्याण येथून अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून, आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जळालेल्या गोदामांमध्ये मोठ्या प्रमाणात रसायने, प्रिंटिंग मशिन्स, इलेक्ट्रॉनिक वस्तू, प्रथिनेयुक्त आरोग्य अन्न पावडर, सौंदर्यप्रसाधने, कपडे, शूज, फर्निचर आणि मंडप सजावटीचे साहित्य साठवलेले होते. त्यामुळे आगीने मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज आहेत. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून यासंदर्भात अधिक तपास सुरू आहे.

नुकसान झालेल्या कंपन्यांची नावे

- केके इंडिया पेट्रोलियम स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड
- कॅनन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
- ब्राइट लाईफकेअर प्रायव्हेट लिमिटेड
- होलिसोल प्रायव्हेट लिमिटेड
- ॲबॉट हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड

गोखले लोहमार्ग उड्डाणपूल वाहतुकीस खुला... विक्रमी वेळेत पूर्णत्वास!

हा प्रकल्प अभियांत्रिकीचा अद्वितीय नमुना - शेलार

अभियांत्रिकीदृष्ट्या आव्हानात्मक स्थितीला सामोरे जात पूर्णत्वास आलेला हा प्रकल्प म्हणजे अभियांत्रिकीचा अद्वितीय नमुना ठरला आहे, असे गौरवोद्गार राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी उदघाटनाप्रसंगी काढले. या पुलाच्या जोडणीमुळे मुंबईच्या विकासाचा वेग चौपट वाढणार असल्याचा विश्वासदेखील शेलार यांनी व्यक्त केला. यावेळी खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, आमदार मुरजी पटेल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, उपआयुक्त (पायाभूत सुविधा) शशांक भोरे, प्रमुख अभियंता (पूल) उत्तम श्रोते यांच्यासह विविध मान्यवर, स्थानिक नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते.

■**मुंबई :** गोखले पुलाच्या बहुप्रतिक्षित दुसऱ्या भागाचे उद्घाटन रविवारी सायंकाळी भाजपचे सांस्कृतिक मंत्री आणि मुंबई उपनगर पालकमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. गोखले पूल हा बीएमसीचा सर्वात जलद पूर्ण झालेला प्रकल्प असून पूल बंद झाल्यापासून २८ महिन्यांच्या आत तो खुला झाला आहे. गोखले पुलाचे महानगरपालिकेच्या हद्दीतील काम २५ मार्च २०२१ आणि रेल्वे हद्दीतील काम १ एप्रिल २०२३ रोजी सुरू झाले. या प्रकल्पाचा पहिल्या टप्पा (पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणाऱ्या हलक्या वाहनांसाठी) २६ फेब्रुवारी २०२४ रोजी कार्यान्वित करण्यात आला. तर सी. डी. बर्फीवाला उड्डाणपुलाची उत्तर बाजू ५ जुलै २०२४ रोजी कार्यान्वित झाली. पूल पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी दुसऱ्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून त्याचे लोकार्पण रविवारी करण्यात आले. हा पूल पूर्ण क्षमतेने खुला झाल्याने अंधेरी-पूर्व येथील तेली गल्ली उड्डाणपुलासह गोपाळकृष्ण गोखले पुलामुळे, अंधेरी पूर्व बाजूस असलेल्या पश्चिम द्रुतगती महामागार्पासून अंधेरी पश्चिमेकडील स्वामी विवेकानंद मार्गापर्यंत जोडणी होणार आहे. तर सी. डी. बर्फीवाला उड्डाणपुलाद्वारे, स्वामी विवेकानंद मार्ग चौकातील वाहतूक टाळून, पश्चिम दिशेकडील जे.व्ही.पी.डी., जुहू, वेसावेपर्यंत थेट वाहतूकीसाठी सुविधा उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे अंधेरी पूर्व आणि पश्चिम भागांना जोडणारा गोपाळ कृष्ण गोखले पूल नव्याने बांधून विक्रमी वेळेत पूर्णत्वास आला आहे.

पुणेकर महिलेकडून झाला मोठा घोळ ५० रुपयांच्या ऐवजी चुकून ५०,००० पाठवले

■**पुणे :** हल्ली सर्रास गुगल पेचा वापर केला जातो. डिजीटल पेमेंट असलेले हे प्लॅटफॉर्म नागरिकांसाठी सोयीचे तर ठरत आहे. मात्र कधी यामुळं अडचणीदेखील निर्माण होताना दिसतात. तसंच, हल्ली सायबर क्राइमचे जाळे वाढत असताना गुगल पेदेखील लक्ष्य केले जाते. घाईगडबडीत अशा प्लॅटफॉर्मचा वापर केल्यामुळं बँक खात्यातील पैसेदेखील गमावून बसतो. अशीच एक घटना पुण्यात घडली आहे. एका महिलेने रिक्षाचे ५० रुपये भाडे गुगल पेद्वारे देताना चुकून ५० हजार रुपयांची रक्कम पाठवली. मात्र चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी रिक्षाचालकाला संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काहीच फायदा झाला नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका महिलेने रिक्षाचे ५० रुपये भाडे गुगल पे वरून देताना चुकून ५० रुपयांऐवजी ५० हजार रुपये दिले. गडबड झाल्याचे लक्षात येईपर्यंत रिक्षा चालकाने मोबाईल फोन बंद करून ठेवला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार यातील महिला तक्रारदाराने प्रवासादरम्यान रिक्षाचालकाला चुकून पन्नास हजार रुपये गुगल पे केल्यानंतर तिने रिक्षा चालकास वेळोवेळी संपर्क केला मात्र त्यांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही. रिक्षा चालक फोन उचलत नाही हे पाहून तिने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तात्काळ दखल घेत रिक्षा चालकाला शोधून पोलीस ठाण्यात आणले.

त्यानंतर तक्रारदार महिलेला पन्नास हजार रुपये परत मिळवून दिले. त्यामुळं तक्रारदार महिलेने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याचे आभार मानले.

बनावट ई-मेलद्वारे ११ लाख गायब

बनावट ई-मेलद्वारे कंपनीची 11 लाख रुपयांना फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी दक्षिण सायबर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. दक्षिण मुंबईतील ३१ वर्षीय तक्रारदार यांची आरोग्यविषयक समस्या सोडवणारी कंपनी आहे. १९ एप्रिलला रात्री कंपनीच्या ई-मेल आयडीवरून एका कंपनीच्या आयडीवर ११ लाख रुपये पाठविण्यास सांगण्यात आले. २४ तारखेला पैसे पाठवल्यानंतर त्यांनी त्याबाबत कळवले. तेव्हा, त्या कंपनीकडून पैसे मिळाले नसल्याचे त्यांना समजले. ई-मेल तपासताच भामट्याने अधिकृत मेलमध्ये एक अक्षर गायब करून हुबेहूब वाटणाऱ्या बनावट आयडीवरून ई-मेल करून फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले.

ऑनलाईन फसवणूक झालेल्या ६ तक्रारदारांना ७ लाख ७१ हजार परत

■**भाईंदर :** मिरा -भाईंदर शहरातील नागरिकांची ऑनलाईन गुंतवणूक ॲपमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून फसवणूक करण्यात आली होती. या फसवणूक झालेल्या गुन्ह्याचा सायबर पोलीस ठाणे यांनी तपास करुन ६ तक्रारदारांना ७ लाख ७१ हजार ७३२ रुपए परत मिळवून दिले आहेत. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वेगवेगळ्या पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील ६ तक्रारदारांनी समाज माध्यमांवरील जाहिरात पाहून जास्त नफा देर्णाया बनावट गुंतवणूक ॲपमध्ये ७ लाख ७१ हजार ७३२ रुपयांची गुंतवणूक केली. याबाबत तक्रारदार यांनी एप्रिल २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत गुंतवणूक केली होती. प्रत्यक्षात रक्कम गुंतवणूक केल्यानंतर त्यांना कोणताही परतावा न मिळाल्याने आर्थिक फसवणुकीबाबत सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. या अजार्ची तात्काळ नोंद करुन त्यांची तक्रार एनसीसीआरपी पोर्टलवर देखील नोंदविण्यात आली. त्यानुसार गुप्ता यांची फसवणुकीची रक्कम १ लाख ५६ हजार, श्रीमती खान यांची फसवणूक झालेली रक्कम २५ हजार ६२३, पाठक यांची फसवणूक झालेली रक्कम १ लाख ५० हजार, प्रजापती यांची फसवणूक झालेली रक्कम १ लाख ९० हजार यादव यांची फसवणूक झालेली रक्कम १ लाख ५६ हजार, श्रीमती प्रजापती यांची फसवणूक झालेली रक्कम ८४ हजार १०९ अशी एकूण ७ लाख ७१ हजार ७३२ रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. या तक्रारदारांचे तक्रार अर्ज प्राप्त करुन तात्काळ फसवणूक झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबवण्यात आली. तक्रारदार यांच्या बँक खात्यांमध्ये थांबवण्यात आलेली रक्कम परत मिळण्यासाठी न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सूचना देण्यात आल्या. सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच न्यायालय यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणूक रक्कम मूळ खात्यात परत मिळवून दिली आहे.

कर्जत येथे सुटकेसमध्ये आढळलेल्या मृतदेहाचे गूढ अखेर समोर

■**पनवेल :** कर्जत तालुक्यातील ठाकूरवाडी रेल्वे स्टेशनजवळ १६ एप्रिल रोजी एक धक्कादायक घटना समोर आली होती. रेल्वे ट्रॅकजवळ आढळलेल्या गुलाबी रंगाच्या ट्रॉली बॅगमध्ये एका तरुणीचा मृतदेह सापडल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली होती. मृतदेहाची ओळख पटवणे अत्यंत अवघड असतानाही केवळ सुटकेसच्या आधारावर नेरळ आणि कर्जत पोलिसांनी तपास सुरू ठेवत अखेर खूनाच्या प्रकरणाचा छडा लावत आरोपींना अटक केली आहे. धनलक्ष्मी एराप्पा रेड्डी ऊर्फ बिंदू (वय ३४) रापताडू, आंध्रप्रदेश असे मृत तरुणीचे नाव असून आरोपी हे उच्चशिक्षित असल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे.

या तपासामध्ये रायगड पोलिसांच्या विशेष तुकड्या

तपास करीत असताना नेरळ पोलिसांना एक धागा सापडला. नेरळ पोलिसांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करून बेंगळुरू येथून दोन आरोपींना अटक केली. तपासादरम्यान पोलिसांनी मुंबईहून दक्षिण भारतात जाणाऱ्या मेल गाड्यांचे सीसीटीव्ही फूटेज बारकाईने तपासले.

या तपासात लोकमान्य टिळक टर्मिनस येथून निघालेल्या मुंबई - कोइंबतूर एक्सप्रेसमध्ये (ता.१५) एक संशयित जोडपं गुलाबी बॅग घेऊन जाताना दिसले. त्यांनी कोणत्या डब्यात प्रवास केला याची शहानिशा करत बेंगळुरू स्थानकावर बॅग नसलेल्या अवस्थेतील त्याच जोडप्याचे दृश्य पोलिसांच्या हाती लागले होते.

बुकिंग तिकीटावरील फोन नंबर आणि लोकेशनच्या आधारे नेरळ पोलिसांनी बेंगळुरूयेथील एका लॉजवर धाड टाकून आरोपी व्हि. विजयकुमार व्यंकटेश (२६) चित्तूर, आंध्रप्रदेश आणि टी यशस्विनी राजा वय २४ तिरुपती, आंध्रप्रदेश या दोघांनाही ताब्यात घेतले. आरोपींना १६ मेपर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे. अशी माहिती अप्पर पोलिस अधीक्षक अभिजित शिवथरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सुटकेसमधील मृतदेह कोणाचा हे प्रकरण उलगडलं आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com